
# माणूस

शनिवार । ३१ मार्च १९७९
७५ पैसे

काही मोजक्याच नाटकांच्या यादीत
जाऊन बसलेले या दशकाचे नाटक




जनता पक्षात घटकवाद कोण
माजवीत आहे ?
‘ हे ढाकणे कोण ? ’
असा उर्मट प्रश्न विचारणारांनी
‘ मुकुंद ठकोजी पाटील कोण ? ’
असा प्रश्न राम नाईक
निवडून आले त्या वेळी
का विचारला नाही ?

## एक
## सडेतोड
## राजकीय लेख

पृष्ठ. . . .७

# साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे-अंक चव्वेचाळीसावा

३१ मार्च १९७९

मूल्य ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४ ३४५९


# जसलोक - जत्रा

श्री. ग. मा.

पंतप्रधान मोरारजी देसाई जयप्रकाशांच्या भेटीसाठी 'जसलोक' मध्ये आले असता चंद्रशेखर, मधू लिमये, एस्. एम्. जोशी ही मंडळी अनुपस्थित राहिली ही घटना थोडी तपशिलात जाऊन पाहण्यासारखी आहे. या अनुपस्थितीचे कारण काय असावे? जयप्रकाशांच्या निधनाचे चुकीचे वृत्त लोकसभेला देऊन मोरारजीभाईंनी जी लाजिरवाणी चूक केली तिचा निषेध करावा, याबद्दलची आपली चीड व्यक्त करावी, म्हणून हे तिघेजण लांब राहिले, मोरारजी असेपर्यंत जसलोककडे फिरकले नाहीत, असे एक कारण दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांतून देण्यात आले होते. असे जर असेल तर त्यात काहीच अयोग्य व टीका करण्यासारखे नाही. मोरारजी म्हणजे अनुभवी व कसलेले प्रशासक. त्यांच्या हातून एवढी मोठी घोडचूक व्हावी हे खरोखरच आश्चर्य आहे. दोषी असतील त्यांना शासन घडले तरी या चुकीमुळे जनता-सरकारची झालेली बेअब्रू काही पुन्हा सावरता येत नाही. शिवाय जनता पक्षाला पितृस्थानी असणाऱ्या जे. पीं.बाबतच हा प्रमाद घडून येणे हे आणखीच दुर्दैव म्हटले पाहिजे. यामुळे एस्. एम्., चंद्रशेखर यांच्यासारखी जे. पीं.शी निकटचे भावनिक संबंध असलेली मंडळी व्यथित झाली, प्रक्षुब्ध होऊन त्यांनी मोरारजींना जाणवेल अशा पद्धतीने आपला निषेध-राग नोंदवला, यात अस्वाभाविक काहीच नाही. अशी तीव्र प्रतिक्रिया न उमटणेच खरे म्हणजे अस्वाभाविक होते; पण नंतर मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी या घटनेबाबत जो खुलासा वृत्तपत्र-प्रतिनिधींना दिला आहे तो फारच चमत्कारिक व जनता-नेत्यांचा एकूण भोंगळपणा आणखीच उघड करणारा आहे. हा खुलासा वाचल्यावर मोरारजींच्या ठिकाणी समजा चंद्रशेखर किंवा अन्य कुणी जनता-नेते असते तरी ही किंवा अशीच दुसरी एखादी चूक त्यांच्याकडूनही झाली नसतीच, असे खात्रीपूर्वक काही सांगता येत नाही. खुलासा विनोदी आहे. तो मुळातूनच वाचण्यासारखा आहे. मुख्यमंत्री वृत्तपत्र-प्रतिनिधींना सांगतात—

'सर्वश्री चंद्रशेखर, मधू लिमये, एस्. एम्. जोशी, रामधन, कृष्णकांत आणि बिहारचे मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांनी पंतप्रधान श्री. देसाई यांच्या भेटीवर बहिष्कार टाकला हे वृत्त खरे नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, ही सर्व मंडळी इंडियन ऑइलच्या गेस्ट हाउसवर भोजनासाठी एकत्र जमली होती. 'पंतप्रधानांना विमानतळावरून घेऊन आम्ही हेलिकॉप्टरने जाणार आहोत आणि हे हेलिकॉप्टर या गेस्ट हाउसवरून जाणार असल्याने त्याचा आवाज तुम्हाला ऐकू येईल. तो आवाज ऐकला की, तुम्ही जसलोककडे निघा' असे आपण या नेतेमंडळींना सांगून ठेवले होते. तथापी, ऐन वेळी आम्ही हेलिकॉप्टरऐवजी मोटारीने 'जसलोक' कडे आलो. त्यामुळे हेलिकॉप्टरचा आवाज येण्याचा प्रश्नच उद्भवला नाही! ही सर्व नेतेमंडळी गेस्ट हाउसवर हेलिकॉप्टरच्या आवाजाची प्रतीक्षा करीत बसली. दरम्यान पंतप्रधान व मी (पवार) जसलोकमध्ये आलो. अर्थात तेव्हा ही नेतेमंडळी रुग्णालयात हजर नव्हती. त्यामुळे त्यांनी 'बहिष्कार' टाकला हे म्हणणे योग्य नाही.' (लोकसत्ता दि. २५ मार्च)

या नेतेमंडळींनी पंतप्रधानांच्या जसलोक-भेटीवर उघडउघड 'बहिष्कार' टाकला असता तर त्यात वावगे, आक्षेपार्ह काहीच नव्हते; पण, हेलिकॉप्टरची घरघर ऐकू न आल्याने घोटाळा झाला, हा या जनता नेत्यांच्या गबाळेपणाचा एक रोकडा पुरावाच म्हटला पाहिजे. पवारांचा हा वरील खुलासा खरा मानला तर काही अगदी प्राथमिक शंका

उपस्थित होतात. १ : खुलासा पवारांनी का करावा ? चंद्रशेखर, एस्. एम्. यांनी करायला हरकत नव्हती. २ : चंद्रशेखरांनी अगोदर केलेला एक खुलासा वेगळाच आहे. ते मोरारजी यायच्या वेळेला म्हणे भोजन व विश्रांतीसाठी गेलेले होते. जयप्रकाशांसाठी ते मुख्यत: आलेले असल्याने पंतप्रधानांसाठी आपल्या कार्यक्रमात बदल करण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाही. यात उघडउघड 'बहिष्कार' नसला तरी राग–निषेध जरूर डोकावतो व तो स्वाभाविक व स्वागतार्हही ठरायला हरकत नाही; पण मग जसलोक-मधून राजकीय विषयांवर मुलाखती–मत-प्रदर्शन करण्याचेही या मुक्कामात तरी त्यांनी टाळायला हवे होते. शिवाय पवारांचा हेलिकॉप्टर–खुलासा या चंद्रशेखरांच्या भोजन–विश्रांती कार्यक्रमाशी जुळत नाही, ते वेगळेच. ३ : विमानतळावरून हेलिकॉप्टर-ऐवजी मोटारीने यायचे ऐनवेळी ठरले असे पवार म्हणतात. मग हा कार्यक्रमातील बदल कुणाच्या तरी मार्फत विमानतळावरून फोन करून इंडियन ऑइल गेस्ट हाउसमध्ये, हेलि-कॉप्टरच्या घरघरीची 'प्रतीक्षा' करीत बसलेल्या नेतेमंडळींना कळविणे पवारांना आवश्यक वाटले नाही का ? ४ : पवारांनी समजा नाही कळविले. ही नेतेमंडळी तरी घरघरीची वेळ टळून गेल्यावर स्वस्थ कशी काय बसून राहिली ? त्यांनी विमानतळाशी फोनवरून संपर्क साधून चौकशी करायला काय हरकत होती ? त्यांना सुचलेच नाही की जायचे मनातच नव्हते ? सुचलेच नसेल, पवार म्हणतात त्याप्रमाणे ही नेतेमंडळी गेस्टहाउसमध्ये हेलिकॉप्टर-घरघरीची केवळ 'प्रतीक्षा' करीत राहिली असतील तर गल-थानपणाचा हा एक नवा पुरावाच मानायला हवा. बहिष्कार टाकण्यात निदान तेजस्वी-पणाची झाक तरी आहे. सहा जनता नेते इंडियन ऑइल कंपनीच्या गेस्ट हाउसमध्ये 'प्रतीक्षा' करीत बसलेले आहेत, यात एका प्रांताचे मुख्यमंत्री असलेले कर्पूरी ठाकूरही आहेत, हे दृश्य मात्र फारच केविलवाणे आहे. पवारांचा खुलासा म्हणूनच स्वीकारावासा वाटत नाही. मधु लिमयांनी तरी निदान 'हो. आम्हाला बहिष्कारच अभिप्रेत होता' असे ठणकावून का जाहीर करू नये ? ते खूप स्पष्टवक्ते नाही तरी आहेतच.

□

जयप्रकाशांना जसलोकमध्ये आणल्यावर नेत्यांची तिथे जी भाऊगर्दी उसळली, काहींनी तिथे 'ठिय्या' मांडून जी अडचण केली त्याबद्दल नाराजी व टीका, म. टाइम्स-सारख्या राजापेक्षाही राजनिष्ठ असलेल्या वृत्तपत्रातून यावी, हे थोडे नवलच घडले; पण अशी गर्दी कमी करण्याचा उपाय या टाइम्ससारख्या वजनदार वृत्तपत्रांच्या हातीच असतो, हे कसे ध्यानात घेतले जात नाही ? पहिल्या दिवसापासून वृत्तपत्रांनी प्रचंड मथळे देऊन, छायाचित्रे टाकून या विषयाला भरपूर व सविस्तर प्रसिद्धी दिली. जसलोक हे त्यामुळे प्रसिद्धीचे ठिकाण साह-जिकच बनले. मग नेतेमंडळी तेथे गर्दी करणार नाहीत, हे शक्य तरी आहे काय ? कुठलीही गोष्ट प्रमाणाबाहेर नेऊन हास्या-स्पद करून सोडण्यात भारतीयांचा हातखंडा आहे. वृत्तपत्रांनी प्रमाणाबाहेर प्रसिद्धी दिली, त्यामुळे नेत्यांची आवकही वाढली. सगळ्यांनी यायची खरोखरच गरज होती का ? हा आला म्हणून तो आला. आणि प्रसिद्धी मिळते, नाव-फोटो येतो म्हणून आणखीही येत राहिले. दिल्लीतले १।२ प्रमुख नेते, जवळचे एस्. एम्. / चंद्रशेखरां-सारखे अनुयायी, नातेवाईक एवढ्यावर काम भागू शकले असते; पण हरियानाचे मुख्य-मंत्री कशाला ? नको तेवढे नेते येऊन पाय-धूळ झाडून गेले. नेते येत राहिले म्हणून बाहेरची गर्दीही वाढली. फरक एवढाच की गर्दी स्वखर्चाने आली. नेत्यांचा येण्या-जाण्याचा-राहण्याचा खर्च मात्र सरकारी तिजोरीतून झाला ! जे. पीं. ना सरकारी खर्चाने भेटण्याची सोय व संधी उपलब्ध नसती तर यापैकी किती जण पदरमोड करून आले असते, हा एक न विचारता येण्या-सारखाच प्रश्न आहे. हा नेत्यांचा गोंधळ कमी होता म्हणून की काय, अनुयायांनी 'प्रार्थने'चा कार्यक्रम रेटला. हे भावनाप्रदर्शन अगदी रुग्णालयातच करणे आवश्यक होते का ? अशा प्रार्थनांनी जे. पीं. ना बरे वाटेल ही समजूत तरी एक अंधश्रद्धाच नाही का ? जे धार्मिक आहेत त्यांचा प्रश्नच नाही; पण जे निधार्मिक, सेक्युलर वगैरे आहेत त्यांनीही या प्रार्थना-कार्यक्रमात सहभागी व्हायचे काय कारण होते ? परिपूर्ण धार्मिक आणि सखोल अध्यात्मिक असलेले विनोबाच मग या सगळ्यांपेक्षा वेगळे आणि श्रेष्ठ ठरले असे म्हणावे लागते. त्यांनी प्रार्थना वगैरे काही केली नाही किंवा करा म्हणूनही कुणाला सांगितले नाही. प्रार्थना म्हणजे काही तरी 'मागणे' आलेच. 'अपेक्षा' प्रार्थनेत असतेच. विनोबांनी याउलट 'रामकृष्ण-हरी'चे 'स्मरण' करा एवढेच फक्त कळवले. मरण अटळच असेल तर ते योगि-याचे असावे, हा यातला भावार्थ. श्रेष्ठ भारतीयाचे याहून कुठले थोर भाग्य असू शकते ? तो हे जग सोडून जातो, जसे तुकाराममहाराज गेले तसा. कार्यभाग आटोपला. निघाले 'आपुल्या गावा', 'आमुचा रामराम घ्यावा' म्हणत. असेच रामदास आणि एकनाथ गेले, ज्ञानेश्वर-शंकराचार्य गेले. 'वीर पहावा रणी । महात्मा मरणी ।।' असे म्हणतात ते यासाठी. जे. पी. केवळ 'लोकनायक' असते, 'नेते' असते तर कदाचित् विनोबांनी त्यांना या श्रेष्ठ भारतीय आदर्शाची आठवण करून दिलीही नसती; पण जे. पी. नि:संशय त्याहून अधिक आहेत. म्हणून विनोबांची अपेक्षाही अधिक. मरण येणारच असेल तर त्याचे योग्याच्या महानिर्वाणात रूपांतर होऊ द्या. करायचे ते सर्व करून झाले. सांगायचे ते अनेकदा सांगून झाले. आता फक्त राम-कृष्णहरी...काया सारी ईश्वराधीन. 'औषधं जान्हवीतोयं । वैद्यो नारायणो हरि: ' अशी शांत-निवांत अवस्था. खरोखर अशी अवस्था यायला भाग्यच लागते. जेव्हा केव्हा वेळ आणि काळ येईल तेव्हा जे. पीं.ना हे भाग्य लाभो ! ... □

## प्रार्थना, ईश्वर आणि निरीश्वर

बुधवारी (दि. २१) महाराष्ट्र विधान-सभेत श्री जयप्रकाश नारायण यांना आराम पडावा म्हणून सदिच्छा व्यक्त करणारा एक छोटासा ठराव अविरोध संमत झाला. प्रश्नोत्तराचा तास संपल्यावर लगेचच महसूल-मंत्री श्री. उत्तमराव पाटील यांनी असा ठराव सभापतींच्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवला. सभापती श्री. शिवराज पाटील यांनी लगेच त्याला मान्यता दिली व असा ठराव, कुणाचाही विरोध नसल्याने आपण जे. पीं.-कडे पाठवीत आहोत असे जाहीर केले. या ठरावाच्या मसुद्यात 'जेपींना लवकर बरे वाटो अशी प्रार्थना हे सभागृह ईश्वराकडे करीत आहे' असे वाक्य होते. या भावनांशी सहमत असतानाही मार्क्सवादी आमदार प्रभाकर संझगिरी यांनी 'ईश्वराकडे प्रार्थना' या शब्दास विरोध केला. सभापती श्री. पाटील यांनी या वेळी श्री. संझगिरी यांना हा विषय न लांबविण्यास सांगितले म्हणून ही चर्चा तिथेच थांबली.

—विनय सहस्रबुद्धे

# जनता पक्ष

## केंद्रातील सत्तेची दोन वर्षे

वा. दा. रानडे

केंद्रात जनता पक्षाचे सरकार अधिकारावर आल्याला २४ मार्चला दोन वर्षे पुरी झाली. जनतेच्या अपेक्षा आपण कितपत पुऱ्या केल्या याचा अंतर्मुख होऊन विचार पक्षाच्या नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी करायला हवा. पक्षाच्या हितचिंतकांना काय वाटते हेही लक्षात घ्यावयास हवे. जनता पक्षाबद्दल १९७७ च्या निवडणुकांचे वेळी वाटणारा उत्साह आता राहिलेला नाही हे तर मान्य करायलाच हवे. असा उत्साह सतत टिकत नसतो हे खरे; पण जनता पक्षाला असलेल्या पाठिंब्यात बरीच घट झाली आहे.

दक्षिणेत पक्षाला अजून पाय रोवता आलेला नाही आणि उत्तरेत तो पोटनिवडणुकात विजयी होत असला तरी मतांचे प्रमाण बरेच घटले आहे. कर्पूरी ठाकूर १९७७ मध्ये लोकसभेवर ३ लाख २७ हजार मतांच्या आघाडीने निवडून आले होते. पुढे ते बिहारचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांची लोकसभेची जागा रिकामी झाली. त्यासाठी झालेल्या पोटनिवडणुकीत जनता पक्षाने जागा जिंकली खरी; पण मतांची आघाडी तीन लाखांनी घटली आणि सत्तावीस हजार मतांच्या आघाडीने त्या पक्षाचा उमेदवार निवडून आला. मतांच्या तफावतीचा हा उच्चांक होता. जनता उमेदवारांनी जिंकलेल्या इतर उमेदवारांच्या बाबतीत तफावत एवढी मोठी नसली तरी १९७७ च्या तुलनेने त्यामध्ये लक्षणीय घट झालेली आहे.

जनता सरकारने लोकांना त्यांचे नागरी हक्क पुन्हा मिळवून दिले व लोकशाहीची पुन्हा प्रतिष्ठापना केली, हे त्याचे सर्वांत मोठे कार्य यात शंकाच नाही; पण हे साध्य झाल्यानंतर जनतेचे निकडीचे प्रश्न सोडविण्याचा कार्यक्रम सरकार धडाक्याने हाती घेईल, ही अपेक्षा मात्र खरी ठरली नाही. दारिद्र्यनिवारण आणि बेकारीनिवारण हे मुख्य प्रश्न देशापुढे आहेत. दहा वर्षांत ते सोडविण्याचे आश्वासन मंत्री देत आहेत. काही कार्यक्रमही आखण्यात आला आहे. जास्त लोकांना ज्यात रोजगार मिळेल अशा उद्योगधंद्यांची वाढ करण्याचे सरकारचे धोरण आहे. ग्रामीण भागाच्या औद्योगिक विकासावर भर दिला जात आहे. लघुउद्योगांना उत्तेजन व मदत मिळत आहे. धोरणाची ही दिशा योग्य असली तरी अंमलबजावणीस अजून वेग आलेला नाही. देशातील जवळजवळ निम्मे लोक दारिद्र्यरेषेखालचे जिणे जगत असून बेकारांची संख्याही वाढत आहे; तेव्हा दारिद्र्यनिवारण व बेकारीनिवारणाच्या कार्यक्रमास अग्रहक्क देऊन वेग आणणे ही तातडीची गरज आहे.

कार्यक्रमाच्या अंमलबजावणीस वेग का येत नाही ? योजनेच्या अंमलबजावणीसाठी नोकरशाहीवर विसंबून रहायचे, ही कॉंग्रेस राजवटीतली पद्धत होती. जनता राजवट आल्यानंतरही त्यात बदल झालेला नाही. पक्षकार्यकर्त्यांनी कार्यक्रमास गती द्यावयास हवी; पण कॉंग्रेस कार्यकर्त्यांपेक्षा ते काही निराळ्या पद्धतीने वागत असल्याचे दिसत नाही. कॉंग्रेस कार्यकर्त्यांप्रमाणेच बहुसंख्य जनता कार्यकर्त्यांना रचनात्मक किंवा विकासकार्यापेक्षा अधिकारपदे मिळविण्यातच अधिक रस आहे. पक्षाने वास्तविक कार्यकर्त्यांचे दल उभारावयास हवे होते. हे काम मुख्यत: पक्षसंघटनेचे; पण गेल्या दोन वर्षांत पक्षसंघटना कार्याकडेच दुर्लक्ष झाले. घटक पक्षातील भांडणे भांडण्यातच कार्यकर्त्यांचा वेळ जाऊ लागला. या घटकवादातून पक्ष अजूनही बाहेर पडलेला नाही.

मंत्र्यांमध्येच संघर्ष होऊ लागले तर कारभारात कार्यक्षमता येणार कशी ? इंदिरा गांधींविरुद्ध कारवाईच्या प्रश्नावर मंत्रिमंडळात मतभेद निर्माण झाले. निश्चित आरोप ठेवण्यासाठी सबळ पुरावा हाती असल्याशिवाय त्यांना अटक करू नये, अशी पंतप्रधान मोरारजीभाईंची भूमिका होती, व ती योग्य होती; पण आपण सरदार पटेलांसारखे पोलादी गृहमंत्री आहोत, असे सिद्ध करण्याची चरणसिंगांना घाई झाली होती. त्यांनी इंदिरा गांधींना घाईने अटक केली; पण मॅजिस्ट्रेटने दुसऱ्याच दिवशी त्यांना मुक्त केले. या प्रकरणात जनता सरकारचे तर हसे झालेच, पण इंदिरा गांधींना पुन्हा राजकारणात नेतेपद मिळविण्यास योग्य संधी मिळाली. एकदा हसे झाल्यानंतरसुद्धा चरणसिंगांच्या कार्यपद्धतीत काही फरक पडला नाही. इंदिरा गांधींविषयक त्वरित कारवाई करायला हवी. मंत्रिमंडळ नामर्द असल्याची जनतेची भावना झाली आहे, असा जाहीर आरोप पत्रकार परिषदेत करून त्यांनी मंत्रिमंडळाच्या संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वाचा भंग केला. दुसरे केंद्रीय मंत्री राजनारायण यांनीही सिमल्यास बंदीहुकूम मोडून भाषण केले. तेव्हा या दोन मंत्र्यांचे राजिनामे मोरारजीभाईंनी मागितले. ही कारवाई करण्यापूर्वी पंतप्रधान मोरारजीभाईंनी मंत्रिमंडळाची बैठक बोलावून आपल्या सहकाऱ्यांचा सल्ला घेतला होता. इंदिरा गांधी आपल्या लहरीप्रमाणे मंत्रिमंडळाची पुनर्रचना करीत तसे मोरारजीभाईंनी केले नाही; पण मंत्रिपद गेल्याने चरणसिंग व राजनारायण दुखावले गेले. मोराजीभाईंना नेतेपदावरून दूर करण्याच्या दृष्टीने त्यांनी हालचाली सुरू केल्या व कांतिलाल देसाईवरील भ्रष्टाचारांच्या आरोपांची चौकशी झाली पाहिजे, त्यासाठी कमिशन नेमले पाहिजे अशी मागणी केली. या बाबतीत निश्चित स्वरूपाचे लेखी आरोप कोणी केले तर मी ते भारताच्या सरन्यायाधिशांकडे छाननीसाठी पाठवीन अशी तयारी मोरारजीभाईंनी दर्शविली. राज्यसभेत या प्रश्नावर झालेली सर्व चर्चाच सरन्याया-

धिशांकडे पाठविण्याचा निर्णय अखेर घेण्यात आला आणि कांति देसाई–प्रकरणावरचे वादळ शमले.

मध्यस्थांनी केलेले प्रयत्न यशस्वी होऊन चरणसिंगांचा पुन्हा मंत्रिमंडळात प्रवेश झाला. गृहमंत्रिपद त्यांना मिळाले नाही; पण पहिले उपपंतप्रधान हा दर्जा आणि अर्थमंत्रिपद मिळाले. केंद्रीय नेत्यांत समझोता झाला. आता पक्षाचे कार्य सुरळीत चालू होईल असे वाटले होते; पण उत्तर प्रदेशात नवा पेचप्रसंग निर्माण झाला. मुख्यमंत्री राम नरेश यादव यांनी चार मंत्री आपल्याशी सहकार्य करीत नाहीत, असे कारण दाखवून त्यांचे राजिनामे मागितले. यात दोन जनसंघाचे मंत्री होते. मुख्यमंत्र्यांच्या या कृतीच्या निषेधार्थ आणखी आठ जनसंघ मंत्र्यांनी राजिनामे पाठविले व यादव यांनी पक्षाची बैठक बोलावून विश्वासाचा ठराव पुन्हा पास करून घ्यावा, अशी मागणी केली. त्याप्रमाणे बैठक होऊन अविश्वासाचा ठराव पास झाल्याने यादव यांनी मख्यमंत्रिपद सोडले आणि त्यांच्या जागी भालोद गटाचे बनारसीदास मुख्यमंत्री झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी निकटचे संबंध असलेल्या जनसंघाच्या सभासदांना आपण मंत्रिमंडळात घेणार नाही, असे त्यांनी स्पष्टपणे जाहीर केले. जनसंघाने ही अट मानण्याचे नाकारले.

एका घटक पक्षाबाबत बनारसी दास यानी घेतलेली ही भूमिका बरोबर आहे का? जनता पक्षातून जनसंघास अलग पाडण्याचा प्रयत्न यामागे असून मधु लिमये यांच्यासारख्या केंद्रीय नेत्यांनीही या भूमिकेस पाठिंबा दिला आहे. जनसंघाच्या पाठिंब्याशिवाय सत्ता टिकविता येते का याची चाचणी उत्तर प्रदेशात घेतली जात आहे; पण याचे पर्यवसान अखेर पक्षाच्या फुटीत होणे अटळ दिसते. मोरारजीभाईंचा गट व जनसंघ एका बाजूला, पण बाकीचे दुसऱ्या बाजूला असा हा संघर्ष आहे. पंतप्रधानपद मिळविण्यासाठी चरणसिंगांनी सुरू केलेल्या हालचालींचाच हा एक भाग आहे. केंद्रात सत्तेवर आल्यानंतर दोन वर्षांच्या अखेरीस जनता पक्ष फुटीच्या काठावर उभा आहे. □

# श्रीभगवान उवाच

**श्री अर्जुन उवाच**

अर्जुन म्हणे यादवेश्वरा
विश्वरूपी तू बहुरूपी खरा
परि आजचा वेष नरवरा
अलौकिकचि ।

नाही हाती चक्र, नाही काही अस्त्र
कोणी नाही संगती, नारी जरी सहस्र
काय तुझे रूप, काय तुझी वस्त्रं
आज देवा ।

काय आज हे कसले रे ढोंग
की रिपुनिर्दालना रचिले नवे सोंग
आणि डाव वेगळाच खेळे अंतरंग
तव अनंता ।

अचानक आज काय हे वर्तन
होऊनी वैरागी चाले कीर्तन
मनी तुझिया काय बा नर्तन
चालतसे ।

मी साधा भोळा, मातीचा गोळा
आणला आकारा तूचि गोपाळा
दिलेस प्रेम लावलासी लळा
तव नामाचा ।

अजाण मी बाल, तू सर्वज्ञाता
अज्ञान, अबल, तू जगताचा त्राता
विश्वाचे चक्र तुझ्याच हाता
चक्रपाणि ।

सत्वरि सांग हे काय त्वा केले
का हा वेष, हे रूप घेतले
कोणावरी आज काय बेतले
जगन्नियंत्या ।

की केवळ माझिया मनाचेच खेळ
मोडतो मीच, मीच घाली मेळ
सांग बा लवकर, दवडू नको वेळ
अधिक आता ।

**श्री भगवान उवाच**

भुललास रूपा, भुललास वेषा
खरोखरी वेडा तू गुडाकेशा
क्षात्र धर्म तुझा, तोच तुझा पेशा
धनुर्वेदा ।

कळणार काय तुला माझ्या वेदना
कुठे कसा गेलो, झाली ही दैना
गेल्याविना तर मज राहवेना
त्या स्थळी ।

म्हणती मोह सारे मनुजा दुर्बळ
त्या मागे धावे, जरी मृगजळ
मीही परी फसलो त्यात एक वेळ
ऐक कैसा ।

स्वर्गी राहून जीव कंटाळला
म्हटले भूलोकीच्या सफरीला चला
आठवू मथुरा, आठवू वृंदावनमेळा
पुन्हा एकवार ।

पाहू ती यमुना, तिचे जळ काळे
वाळवंटी जिच्या माझी रासक्रीडा चाले
वृक्षांच्या छायेत गोधन विसावे
जेथ माझे ।

सोन्याची द्वारका माझे साम्राज्य
तिच्याविण मजला स्वर्गही त्याज्य
राधेसवे जैसा तैसा अविभाज्य
नगरी माझी ।

गेलो त्या नगरीत नवे आता चित्र
नाही ते प्रासाद, कुणी नाही मित्र
परि खुणा जुन्या बोलाविती मात्र
मन माझे ।

चालता चालता सूर्य बुडाला
बगळ्यांचा गगनी थवा उडाला
पहातचि राही टेकून झाडाला
शांत चित्ते ।

आणि अचानक एकजण आला
' कोण तुम्ही कुठले, विजन का झाला '
तो विप्र सज्जन विचारी मजला
प्रेमभरे ।

बोलण्या काही मी ओठ विलगले
इतक्यात कोणी त्याला बिलगले
पुत्र-रत्न त्याचे काही मागू लागले
पित्याजवळी ।

चॉकलेट हवे, हवी म्हणे गोळी
किंवा बिस्किट, नको मात्र पोळी
समजावी प्रेमाने पिता घेऊन जवळी
स्व-अपत्या ।

परंतु खट्याळ कारटे ते भारी
आपल्याच पित्याला ढुश्याही मारी
दयाळू पिता सारे सहन करी
मूकपणे ।

सांगे मग मजला त्याची कहाणी
पिता तो नयनात आणूनिया पाणी
शहरात धंदा माझा, मी एक वाणी
कैक वर्षे ।

आधीच शहरी जगणे कठीण
संसार करता येत असे शीण
नित्य यातना नित्य समस्या नवीन
उभ्या ठाकती ।

त्यातूनही काढली आजवरी वाट
जीवनाच्या पथी दुर्गम घाट
आता मात्र समोर दिसू लागे काठ
पैलतीराचा ।

आले म्हणे परवा नवे बजेट
कर नवनवे नव्या वर्षाची भेट
पाठवली सरकारने दिल्लीहून थेट
जनतेसाठी ।

पायी घालावे जर पादत्राण
पंधरा रुपयापेक्षा भारी वहाण
पायालाच टोचे विनाकारण
भाव तिचा ।

शौक करू म्हटले, बिडी महाग
घासलेटाचे तेच, वायकोचा राग
काड्यापेटीही ना स्वस्त लावू म्हटले आग
संसारा या ।

खाऊ घ्यावा लेकरा ते शक्य नाही
विचारही मूर्ख हौस करावी काही
आपुलेच नाक आपुलीच बाही
काय करू ।

त्यापेक्षा उठुनी खेड्यात जावे
धंदा सोडावा, बैल जुंपावे
घाम गाळावा सुखे राहावे
जन्मभरी ।

दुग्धव्यवसाय तिथे ना वर्ज्य
मासेही मारावे, भरावे अर्ज
कुटिरोद्योगासाठी मागावे कर्ज
माय-बापा ।

शहरी-ग्रामीण असा केला बघ भेद
घेऊनी शहरातील माणसाचा वेध
आखले यंदाचे सारे बजेट
तूच पाही ।

पण प्रत्येका कैसे हे झेपे
करणे कठीण बोलणे जरी सोपे
मीदेखील सारखा थरथरा कापे
विचारे फक्त ।

असता आमुचा कृष्ण मुरारी
काही का करीना, किती ठेवी नारी
राज्यात त्याच्या प्रजा सुखी भारी
सांगती वृद्ध ।

ऐकून पार्था हे त्याचे बोलणे
व्यर्थ वाटले मला माझे जिणे
दुःखी माझे जन, मी स्वर्गी राहणे
अयोग्यचि ।

परी आता मी करू शके काय
नाही हाती सत्ता, राज्यही जाय
ताक, दही, लोणी, दुधावरली साय
नष्ट सारे ।

म्हणून पालटला मी वेष माझा
कशाला तो शेला, मी नावाचा राजा
व्यर्थ माझे अस्त्र, न वाचवी प्रजा
जे माझी ।

जन्मभरी आता ऐसाच राहणार
प्रजेविण काही ना मज सुचणार
घ्यावे तिचे दुःख, जरी सुख ना देणार
प्रतिज्ञा माझी ।

—सतीश कामत

# बबनराव ढाकणे विरुद्ध बापूराव काळदाते

माधव भांडारी

बबनराव ढाकणे महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष झाले आणि दोन–चार दिवस एकच गदारोळ केला गेला. 'हे ढाकणे कोण ?' असला प्रश्न विचारून महाराष्ट्र जनता पक्षावर पूर्वाश्रमीचा 'जनसंघ' आपली पकड बसवतोय असा आरडाओरडाही केला गेला. आजही केला जातोय. मोहन धारियासारखे नेते महाराष्ट्रातल्या 'जनसंघीयांबाबतची तक्रार रा. स्व. संघाच्या सरसंघचालकांकडे करतात. मृणाल गोरे पंतप्रधानांकडे जाऊन महाराष्ट्रात बोगस सदस्यनोंदणी मोठ्या प्रमाणावर झाल्याची तक्रार करतात. हा साराच प्रकार मुळातून तपासण्यासारखा आहे.

महाराष्ट्र जनता पक्षाच्या अध्यक्षपदाची निवडणूक युद्धस्तरावरून लढवली गेली. संघटनात्मक निवडणुकीची प्रक्रिया जिल्हास्तरापर्यंत येऊन पोचण्यापूर्वीच 'बापूसाहेब काळदाते अविरोध निवडून येणार' अशा बातम्या वर्तमानपत्रांमधून झळकावण्याची व्यवस्था केली गेली. 'राजकारणात सगळंच क्षम्य असतं' असे मानल्यानंतर या प्रचारतंत्राबद्दल तक्रार करण्याचे कारण नाही; पण साधनशुचितेचा बोलघेवडा कैवार घेणारी मंडळी नैतिकतेची किमान मर्यादासुद्धा पाळत नाहीत हे क्लेशकारक आहे. एकीकडे जनता पक्षात घटकवाद बोकाळत आहे म्हणून नक्राश्रू ढाळायचे आणि त्याच वेळेस घटकवादाच्या भिंती पाडण्याऐवजी त्या मजबूत कशा होतील याचीच काळजी घ्यायची, हा खेळ अधिक घातक आहे. अर्थात दलितांचा तोंडाळ कैवार घेत असतानाच आपले क्षुल्लक राजकीय अस्तित्व टिकविण्यासाठी जातिवादाची विषवल्ली मरू न देण्याची जी मंडळी प्रयत्न करतात, त्यांच्याकडून दुसरी अपेक्षाच करता येणार नाही.

जनता पक्षातला घटकवाद संपला तर राजकीय अस्तित्व टिकविण्यासाठी केवळ गुणवत्ता हाच आधार उरणार आहे आणि ते अनेकांना अगदी तळच्या माणसापासून राष्ट्रीय पातळीपर्यंतच्या अनेकांना– न परवडणारे आहे. घटकवादाचा आधार ज्या क्षणी संपेल त्याच क्षणी या मंडळींचे राजकीय अस्तित्वही संपेल, ही भीती ज्यांना वाटते त्यांनीच गेल्या दोन वर्षांत जनता पक्ष एक होऊ दिला नाही. महाराष्ट्र जनता पक्षाच्या निवडणुकीतसुद्धा त्याच मंडळींनी गलिच्छ राजकारण आणले. सुदैवाने त्यांचा पराभव झाला.

बापूसाहेब काळदाते ह्यांच्याबद्दल व्यक्तिशः कुणाला आकस असायचे कारणच नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात गेली अनेक वर्षे ते आघाडीवर आहेत. ते एक उत्कृष्ट वक्ते आहेत; पण त्यांची उमेदवारी 'जनसंघविरोधी' म्हणून पुढे आणायची गरज काय होती ? महाराष्ट्राचे एक ज्येष्ठ नेते म्हणून ते सर्वांना स्वीकारार्ह ठरले नसते काय ? या प्रश्नांचे उत्तर एकच आहे–नकारात्मक दृष्टिकोन ! ह्या मंडळींना कधीच निकोप–होकारात्मक दृष्टिकोन बाळगता आलेला नाही. 'काळदात्यांना अविरोध अध्यक्ष करू या' हा सांगावा धारियांकरवी धाडला जात असतानाच पन्नालाल सुराणांसारखा जबाबदार नेता 'संघाचं नियमन करणं अत्यावश्यक आहे' असा दावा करतो. 'जनसंघीयांना पक्षाबाहेर काढण्याची प्रक्रिया उ. प्र. त सुरू झालेली आहे' 'उ. प्र. मध्ये संघविरोधी युद्धाची पहिली फेरी जिंकली आहे. आता देशभरात ही प्रक्रिया सुरू होईल,' वगैरे समाजवादी प्रलापांबद्दल तोंडदेखला का होईना पण खेद–निषेध व्यक्त करण्याची इच्छा महाराष्ट्रात कोणाला होत नाही. पूर्वाश्रमीच्या जनसंघीयांना दडपण्याची, त्यांचा न्याय्य हक्कसुद्धा त्यांना लाभू न देण्याचीच धडपड ज्यांनी केली त्यांनीच आपल्या माणसाला अविरोध निवडून देण्याचा प्रस्ताव मांडावा हा राजकीय निर्लज्जपणाचा इरसाल नमुना आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका झाल्यानंतर पक्षनेतेपदावर स्वाभाविक हक्क उत्तमराव पाटलांचाच होता. ते जनसंघाचे नसते तरी ! आजारी असूनसुद्धा जनता पक्षाच्या घडणीसाठी आणीबाणीत त्यांनी जे परिश्रम केले त्याला जयप्रकाशजींनीसुद्धा जाहीर दाद दिली; पण त्यांना पक्षनेतेपद लाभू नये म्हणून निवडणुका होण्याच्या आधीपासूनच काळदाते–मृणाल गोरेंच्या नावांचे ढोल बडवले गेले. खासदाराला विधिमंडळ पक्षनेतेपदाची निवडणूक लढवता येणार नाही हे राष्ट्रीय कार्यकारिणीचे मार्गदर्शक तत्त्व मुद्दाम नजरेआड करून ! आणि केंद्रीय नेतृत्वाने त्याचा विसर न पडू दिल्यानंतर त्याचे खापर 'जनसंघी' नानाजी देशमुखांवर फोडण्याचा खटाटोप केला गेला. पण तेच तत्त्व वर्ष दीडवर्षानंतर चंद्रभानु गुप्तांना उत्तर प्रदेशातही लागू केले गेले हे ही मंडळी सोयिस्करपणे विसरली. काळदाते–गोरे उमेदवार असू शकत नाही हे स्पष्ट झाल्यानंतर निहाल अहमद यांना उत्तमरावांच्या विरोधी उभे केले गेले. संख्याबळाचा विचार करता उत्तमराव निवडून येणार हे स्पष्ट होते. पण तिथेही त्यांना अविरोध निवडून देण्याची दिलदार वृत्ती नव्हती. म्हणूनच, केवळ उत्तमरावांना विजयाचा आनंद मिळू नये एवढ्यासाठी निहाल अहमद यांना त्यांच्या विरुद्ध उभे केले गेले. आज काळदात्यांपुढे ढाकणे कोण असा प्रश्न विचारणाऱ्यांना त्यावेळेस 'उत्तमरावांपुढे निहाल अहमद कोण' हा प्रश्न का सुचला नव्हता ? ही वृत्ती वर्षभरानंतरही अजून बदललेली नाही. मुंबई जनता पक्षाच्या अध्यक्षपदावर न्याय्य हक्क असलेल्या रामनाईकांना विरोध करण्यासाठी मुकुंदराव ठकोजी पाटील ह्या माणसाला मारून मुटकून उभे केले गेले. गेले

पृष्ठ २३ वर

# गॉर्की कॉलनी

: लेखक :
**ए. एस. मकरेन्को**

: अनुवाद :
**मीनाक्षी कोल्हटकर**

**कथासूत्र :** नव्या घेतलेल्या ट्रेपकेवाडीची दुरुस्ती करताना बराच त्रास झाला. पण जुन्या कॉलनीतून नव्या कॉलनीत जाण्याच्या या उद्योगामुळे कॉलनीतल्या मुलांची गावकऱ्यांशी चांगली ओळख झाली; पण नंतर त्यांनी गावकऱ्यांचं दूध–दही चोरायला सुरुवात केली. त्यामुळे एक दिवस संध्याकाळी घोडेस्वारांची एक पलटणच कॉलनीत शिरली. त्यांनी आन्तोनना त्यांच्या खोलीतच गिरफ्तार केलं. त्यामुळं मुलं भयंकर संतापली. शेवटी पलटणीचा प्रमुख थोडी दमदाटी करून निघून गेला.

कॉलनीतल्या मुलांच्या मनात या शेतकऱ्याबद्दल अढी बसण्याचं मुख्य कारण म्हणजे त्या शेतकऱ्यांचा सुखवस्तूपणा; पण त्यामुळंच आसपासच्या लोकांचा एक मोर्चाही एकदा कॉलनीवर चालून आला.

ह्या वर्षीच्या उन्हाळयातली एक कमाई म्हणजे पुरवठाखात्याकडून कॉलनीला शेतीसाठी घोडे मिळाले. नव्या कॉलनीत विविध कामांना जोरदार सुरुवात झाली.

## प्रकरण एकविसावे

## भयंकर माणूस

उन्हाळयात संध्याकाळी फारच चांगली हवा पडायची. संधिप्रकाशात आकाशात निरनिराळे रंग दिसायचे. जंगलाच्या पार्श्वभूमीवर ते फारच छान दिसत असे. वाफ्यांच्या कडेने लावलेल्या झाडांवरील सूर्यफुले जणू एका ओळीत बसून दिवसभराच्या श्रमाने दमून विश्रांती घेत आहेत असे वाटत असे. तळयाचा खोलगट उतार संध्याकाळच्या प्रकाशात तळयातच बुडून गेल्यासारखा भासत असे. काही लोक आपल्या घराच्या अंगणात बसून गप्पा मारीत असत. त्यांचे आवाज मधून मधून ऐकायला येत; परंतु कोण कोण व कितीजण बोलत आहेत याचा अंदाज करता येत नसे.

अंधार होत चालला की, लांबचे काही ओळखू येत नसे व कोणतीही वस्तू एकमेकापासून वेगळी दिसत नसे. कॉलनीमध्ये एकदम सुनसुनाट होत असे. ही सारी मुले जातात तरी कोठे, असा प्रश्न पडत असे. एखादी चक्कर जर कॉलनीत टाकली तर मुलांचे घोळके काही ठिकाणी दिसत. कोणी घोडयांच्या पागेत चार–पाचजण भिंतीला टेकून काही तरी चर्चा करताना आढळत. तसेच बेकरीमध्ये बराच मोठा घोळका असे. कारण थोडयाच वेळात पाव भाजून हातात मिळण्याची वेळ होई. त्यामुळे रात्रीच्या जेवणाच्या ड्यूटीवर असलेली मुले तिथेच बाकावर बसून खालच्या आवाजात बोलत असलेली दिसत. कोणी विहिरीवर पाणी भरण्यासाठी आलेली आढळत. विहीर हे प्रासंगिक भेटीचे ठिकाण असे. दुसरा कोणी तिथून जाताना हटकल्यामुळे बोलायला थांबे. कोणी एखादा कोणाला तरी शोधायच्या निमित्ताने आलेला असे. पाणी न्यायचे सारेच विसरत व दुसरेच काही तरी फालतु आणि निरुपयोगी लक्षात ठेवून तिथे येत; परंतु काही असले तरी अशा रम्य संध्याकाळी फालतु गोष्टी येतीलच कशा ?

कॉलनीच्या दुसऱ्या टोकाला तळयाच्या बाजूला थोडा उतार आहे. त्यावर काही छोटी मंडळी घोळका करून एखाद्या झुडपाजवळ बसलेली दिसत व त्या ठिकाणी मिटचागिन काही तरी करीत असे.

सकाळी लोक चर्चमध्ये येत, इकडे-तिकडे पहात व त्या वेळी

त्यांना एकही पाद्री दिसत नसे.

'काय झालं असेल ? एकही पाद्री कसा दिसत नाही ?' असे लोकांनी विचारले तर रखवालदार सांगायचा, 'तुम्हाला माहीत आहे का, भुताटकीनं तुमच्या पाद्रयांना दलदलीत नेऊन टाकलं असलं पाहिजे !'

लोक विचारीत, 'अरे, चारीच्या चारी पाद्रयांना कसं टाकतील?'

त्यावर तो म्हणे, 'इथं एकही नाही, म्हणजे त्यांना सर्वांनाच रात्रीच्या वेळी नेऊन टाकलं असलं पाहिजे !'

आजूबाजूला लपून बसलेली मुले हे ऐकून खिदळत असत. त्यातल्या त्यात आमच्या तोस्काला भुताटकीपेक्षा त्या रखवालदाराच्या मूर्खपणाची मौज वाटायची. एका रात्रीत चारी पाद्रयांना कसे नेले असेल याची तो कल्पना करायचा. तेही साधेसुधे नव्हेत, तर चांगले गलेलठ्ठ असे असलेले !

आजूबाजूच्या झुडपांमधून मुलांच्या व मुलींच्या हसण्या-खिदळण्याचे आवाज येत असत. आमच्या ओल्या हारोन्वाला बुरुन खूप चिडवायचा. एकटी ओल्याच नव्हे तर सगळयाच मुली जोराने हसायच्या. मग बुरुन त्याची चुरगळलेली टोपी हातात घेऊन त्या झाडांच्या मधील जागेत एकदम उभा असलेला दिसे. कधी कधी शेल्यापुतीन त्याच्याजवळ उभा असलेला दिसे. हसावे की नाही, याबद्दल त्याचा अजून निश्चय झालेला दिसत नसे. कारण त्यालाही मुलींच्यावर काही बदला घ्यावयाचा असायचाच.

पण अशा या काव्यमय, शांत, गंभीर वेळाशी मनाने आम्ही समरस होऊ शकत नव्हतो. बहुतेक वेळा कॉलनीचे कोठार किंवा आजूबाजूच्या गावकऱ्यांच्या साठवून ठेवायच्या जागा आणि आमच्या शिक्षकमंडळींच्या खोल्या मुलांच्या कचाटयातून सुटत नसत. अर्थात या बारीकसारीक भुरटया चोऱ्या गेल्या वर्षापेक्षा फारच कमी झाल्या होत्या. नवीन येणाऱ्या रंगरूटाने तसा प्रयत्न केलाच तर त्याला लवकरच धडा मिळत असे. हा धडा दोन प्रकारचा असायचा. एक म्हणजे डायरेक्टरकडून—म्हणजेच माझ्याकडून, दुसरा म्हणजे कॉलनीच्या रहिवाश्यांकडून. हा दुसरा धडा फारच भारी पडत असे. अशा वेळी कॉलनीतली बहुसंख्य मुले त्या अपराध्याचा भयानक समाचार घेत असत. एकदा एक नवा मुलगा एकातेरीनाबाईच्या खोलीत खिडकीतून घुसण्याचा प्रयत्न करीत होता. तेव्हा कॉलनीच्या मुलांनी त्याला एवढा बडवला की, त्याला सोडविताना माझ्या नाकी नऊ आले. रागाच्या भरात त्यांनी मला तिथून जाण्यास सांगायलाही कमी केले नाही !

या वर्षीच्या उन्हाळयात कुझ्मा लेशी नावाचा नवीन मुलगा कॉलनीत भरती झाला. तो बहुधा जिप्सी असावा. त्याचे काळेभोर मोठे डोळे त्याच्या चेहऱ्यावर उठून दिसत. ते भिरभिरणारे डोळे जणू काही सारखे काही तरी शोधीत असत. त्याच्या शरीराचे बाकीचे अवयव त्याच्या डोळयांची आज्ञा बरोबर पाळीत असत. त्याचे पाय त्याला आपोआप त्या वस्तूच्या जवळ खेचून नेत आणि त्याचे हात ती वस्तू बरोबर उचलीत. त्याची पाठ त्याला कुठेही लपायला वाकून मदत करीत असे. त्याचे कान बारीकसारीक आवाज ऐकायला तरबेज असत; पण या सर्वांत त्याचे डोके कितीसा भाग घेत असे ते कळणे कठीणच होते. नंतर कॉलनीत सर्वांनाच त्याच्या डोक्याची खरी किंमत कळली; पण सुरवातीला मात्र त्याचे डोके म्हणजे त्याच्या शरीराचा एक निकामी भाग आहे, अशीच आमची सर्वांची कल्पना होती.

या लेशीने आम्हा सर्वांना ताप दिला, तितकीच आमची करमणूकही केली. काही तरी भानगड केल्याशिवाय त्याचा एकही दिवस गेला नाही. एकदा डुकराच्या चरबीचा सबंध गठ्ठाच त्याने लांबवला. दुसऱ्या वेळेला साखरच खाल्ली, बेकरीतून ब्रेड आणताना त्यातलीच थोडीशी खायची असे त्याचे धंदे चालत. आखून दिलेली कामे लेशीने कधीच नीटपणे केली नाहीत. त्याला कोणतेही हत्यार वापरता आले नाही. त्याचे हात हेच जणू काही हत्यार म्हणून तो वापरीत असे. मुलांनी त्याला झोडपून पाहिले. त्यावर हसून उलट त्याने त्यांनाच सांगितले, 'कसं होतं ते माझं मलाच समजत नाही. माझ्या जागी तुम्ही असता तर कदाचित असंच केलं असतंत !'

इतके होऊनही कुझ्मा नेहमी हसतमुख असे. त्याने आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत बराच अनुभव घेतला होता. पुष्कळ प्रवासही केला होता. पुष्कळ पाहिले होते आणि छोटया-मोठया गुन्ह्यात बऱ्याचदा तुरुंगाची हवाही तो खाऊन आला होता. त्याला लिहिता-वाचता येत असे व तसा तो खिलाडू वृत्तीचा होता. त्याला भीती व संकोच माहीतच नव्हता. तो खोषाक नृत्य चांगले करीत असे.

या त्याच्या गुणांमुळे त्याच्या काही दुर्गुणांकडे मुले दुर्लक्ष करीत; परंतु त्याच्या चोरटया स्वभावाचा सगळयांनाच त्रास होऊ लागला. शेवटी एकदा याचा परिणाम म्हणून त्याला फार मोठी किंमत द्यावी लागली. बरेच दिवस त्याला बिछान्यात पडून रहावे लागले. त्याचे असे झाले की, एक दिवस तो बेकरीत घुसला आणि जबर मार खाऊन बाहेर पडला. आमच्या बेकरीचा प्रमुख ग्रेतकोवस्की याला ब्रेड बाहेर काढताना कमी असलेली आढळून येई आणि त्याचे कारण त्याला बरेच दिवस उमजत नव्हते. त्याला विचाऱ्याला रोजच्या रोज कालिनासाहेबांची बोलणी खावी लागत. भरपूर पीठ देऊनही तयार ब्रेड वजनात नेहमीच कमी भरायचे. बिचारा कोत्स्या याला काही उत्तर देऊ शकत नसे. शेवटी एक दिवस कोत्स्याने एक योजना तयार केली. लेशी त्या जाळयात बरोबर पकडला गेला आणि त्याला त्याचा भरपूर प्रसाद मिळाला; परंतु लेशी कसला वस्ताद ! मार खाल्ला ही गोष्ट त्याने लपवून ठेवली. दुसऱ्या दिवशी एकातेरीनाबाईंच्याकडे जाऊन आपल्या जखमेवर औषध लावावे, अशी त्याने विनंती केली. साहजिकच बाईंनी जखम कशी झाली म्हणून विचारले. लेशीने, आपण मलबेरी काढायला झाडावर चढलो असताना खाली पडल्यामुळे जखम झाली, असे ठोकून दिले. बिचाऱ्या बाईंनी लेशीच्या जखमांना औषध-पाणी वगैरे केले आणि त्याला डॉरमिटरीत नेऊन झोपवला. कोत्साने पण या बाबतीत कोणाकडेही उच्चार केला नाही. उलट फावल्या वेळात लेशीच्या जवळ बसून त्याला टॉम सॉयरच्या धाडसी गोष्टींचे पुस्तक तो वाचून दाखवीत असे.

लेशी बरा झाल्यानंतर त्याने झालेली हकीगत स्वतःच हसत हसत सर्वांना सांगितली.

त्यावर कारवानोवने त्याला समजावणीच्या सुरात सांगितले, 'हे बघ कुझ्मा, एवढं झाल्यानंतर माझ्यासारख्यानं चोरी करणं

कधीच सोडून दिलं असतं. अशानं एक दिवस जिवानिशी मरशील !'

'खरं सांगू का ? असं का होतं हे मलाही समजत नाही. कदाचित मी सराईत चोर नसेन; पण मी आणखी थोड्या वेळा प्रयत्न करून पहाणार आहे. याचीच पुनरावृत्ती झाली तर मी चोरी करणं सोडून देईन ! मी म्हणतो ते बरोबर आहे की नाही ?' असे त्याने विचारले.

'पुन्हा कधी तरी कशाला ? आजच प्रयत्न करून टाक ! तू असल्या कामात हुषार नाहीस !' मी सांगितले.

'असं म्हणता ? पण सेमियान पेत्रोविचनं मला सांगितलं की, तू लोहाराचं काम चांगलं करशील !'

'त्यानं असं सांगितलं ?'

'होय. त्यानं असं सांगितलं; पण मी लोहार खात्यातून दोन नळ चोरले असा त्यानं माझ्यावर आरोप केला आहे !'

'कदाचित ते आत्ताच तुझ्या खिशात असतील !' असे मी त्याला सांगितले.

लेशी शरमेने काळवंडला. कारबानोवने त्याचा दंड धरून दुसऱ्या हाताने त्याचे खिसे चाचपायला सुरुवात केली. खिशातून हात बाहेर काढून तो ओरडला,

'खरोखरीच आहेत ! झालं, हीच तुझी ठरविलेली पहिली वेळ आणि त्यात तू ठरल्याप्रमाणं हरलास !'

'नशीब माझं !' असे म्हणून त्याने आपले खिसे रिकामे केले.

कॉलनीमध्ये अशा गोष्टी क्वचितच उद्भवत असत; परंतु गावातल्या गावकऱ्यांच्या घरांकडे अजूनही आमच्या मुलांचे लक्ष वेधलेले असे; परंतु या चोऱ्या अतिशय पद्धतशीर आणि योजनाबद्ध असत. आमच्यातली मोठी मुलेच या कामामध्ये भाग घेत. बिचारी छोटी मुले या कामातून अजिबात वगळलेली होती. चुकूनमाकून त्यांनी कधी प्रयत्न केलाच तर त्यांना मोठ्यांकडून जबर शिक्षा मिळत असे. आमची मोठी मुले एवढी तरबेज होती की, गावकऱ्यांनासुद्धा त्यांचा संशय घेऊन आमच्याकडे तक्रार करायला येण्याचे धैर्य होत नसे. या सगळ्या भानगडीचे नेतृत्व करणारा दुसरा-तिसरा कोणी नसून आमचा मिट्यागिन होता, याबद्दल माझी पक्की खात्री होती.

मिट्यागिन हा लहानपणापासून चोऱ्या करण्यात वाकबगार होता; परंतु कॉलनीमध्ये तो चोऱ्या करीत नसे. ह्याचे एक कारण म्हणजे तो आपल्या मित्रांना मानीत असे. कॉलनीत चोरी करणे म्हणजे आपल्या दोस्तांना अडचणीत टाकणे ही त्याची पक्की समजूत होती; पण गावकऱ्यांच्या वाडीतून किंवा शहरातल्या बाजारातून चोरी करणे त्याला कधीच चुकीचे वाटले नाही. तो अनेकदा कॉलनीतून रात्रीच्या वेळी नाहीसा होत असे आणि सकाळी न्याहारीला वेळेवर येत नसे. दर रविवारी तो सुट्टी मागायचा आणि रात्री उशीरा कॉलनीत परत यायचा. अशा वेळी त्याच्याजवळ अनेक नव्या वस्तू सापडत असत. या छोट्या छोट्या वस्तू दिलदारपणे आमच्या छोट्या मंडळींना तो वाटून टाकीत असे. त्यामुळे ते सर्वजण त्याच्यावर फार खूष होते; पण या वस्तू वाटण्यामागचा हेतू तो कधीच सांगत नसे !

मिट्यागिनला माझ्याबद्दल फार आदर होता. या चोरीच्या मामल्याबद्दल आम्हा दोघांत कधीच चर्चा झाली नव्हती. चर्चा करून त्याला सुधारणे अशक्यच होते, अशी माझी खात्री होती.

पण एकंदर मिट्यागिनने माझ्या डोक्याला बराच त्रास दिला होता. तो अतिशय हुषार व चाणाक्ष मुलगा होता. त्यामुळे त्याच्या हुषारीबद्दल सर्वांना आदर होता. आपल्या चोरट्या प्रवृत्तीचे काही तरी बहाण्याखाली प्रदर्शन करायचे त्याला बरोबर समजत असे. त्याच्या भोवती सदैव काही मोठ्या मुलांचा घोळका असे आणि हे सर्वजण त्याचा शब्द तत्परतेने झेलीत असत. तसेच मिट्यागिनला कॉलनी व शिक्षकमंडळी याबद्दलचा असलेला आदरही ती मानीत. रात्रीच्या वेळी ही मंडळी काय करीत असत, हे समजणे मोठे कठीण होऊन बसले होते. ते शोधून काढायचे तर एक तर त्यांच्यावर टेहळणी करणे आवश्यक होते किंवा त्यांना बोलावून प्रत्यक्ष चर्चा करणे; पण हे दोन्ही मार्ग मला स्वतःला धोक्याचे वाटत होते. त्यामुळे एकंदर कॉलनीच्या शिस्तीला धक्का पोचला असता. मोठ्या मुष्किलीने बसविलेली घडी विस्कटून गेली असती.

मिट्यागिनच्या नाहीसे होण्याची बातमी मी जेव्हा जेव्हा ऐकत असे तेव्हा तेव्हा आमच्या मेळाव्यात मी त्याबद्दल कडक शब्दात निर्भर्त्सना करीत असे. कधी कधी शिक्षाही करीत असे. ऑफिसात त्याला एकट्याला बोलावून खूप रागावत असे; परंतु अशा वेळी मिट्यागिन चेहरा कमालीचा शांत ठेवीत असे. कधी कधी लाडिकपणे मला अभिवादन करून, स्मितहास्य करून जात असे.

कॉलनीचे नाव चांगले राखण्याबद्दल त्याचा कटाक्ष असे आणि त्याच्या टोळीतला चुकून कोणी सापडला तर तो जराही दया-माया दाखवीत नसे. उलट तो म्हणे, 'मूर्ख आहेत लेकाचे ! सदैव आपल्या जरुरीपेक्षा जास्त खाणारे हे गाढव कुठून उत्पन्न होतात कोण जाणे !'

पण मिट्यागिनला अशा परिस्थितीत जास्त दिवस कॉलनीत राहू द्यावे असे मला वाटेना. मी त्याच्या मूर्खपणाला पायबंद घालू शकत नव्हतो हे खरे असले तरी ते मला बोलूनही दाखवता येत नव्हते. त्याच्याबद्दल मला दयाही वाटत असे. त्यालाही कॉलनीत रहाणे प्रशस्त वाटत नसावे; पण कॉलनी सोडून जाणेही त्याच्या जिवावर येत होते. त्याचे सारे मित्र त्याला दुरावले असते. आमची छोटी मंडळी तर त्याला जीव की प्राण करीत !

कॉलनीची काही खंबीर मुले, उदा. कारबानोव, बोल्कोव, वेर्शनेव हेही मिट्यागिनच्या सहवासामध्ये विघडत चालले होते. एकटा बेलुखिनच मिट्यागिनला उघड उघड विरोध करीत असे; परंतु मिट्यागिन आणि बेलुखिन यांचे वैमनस्य तसे कधी विकोपाला गेले नव्हते. बेलुखिन अनेकदा उघडपणे मिट्यागिनच्या चोऱ्यांबद्दल उल्लेख करी. 'मिट्यागिन असेपर्यंत कॉलनीतल्या चोऱ्या कधीही संपणार नाहीत !' असे तो उघड उघड बोलून दाखवीत असे. हे ऐकून मिट्यागिन मंद स्मित करून ते उडवून लावीत असे.

'अरे बेलुखिन, सारेच सज्जन होऊन कसं भागेल ? आसपास दुर्जन असले तरच सज्जनांचा सज्जनपणा उठून दिसेल. माझ्यामुळेच तुझा सज्जनपणा सिद्ध होतोय हे तू कसं विसरतोस ?'

बेलुखिन चिडून म्हणाला, 'मूर्खासारखा वडवडू नकोस ! माझा मोठेपणा तुझ्यामुळं मला मिळतो काय ?'

'खरं आहे ते', मिट्यागिन आणखी पुस्ती जोडून त्याला म्हणे, 'मी चोरी करतो आणि तू चोरी करीत नाहीस म्हणून तू चांगला ठरतोस ! समज, कोणीच चोरी केली नाही तर सारेच जण

सारखे होतील. मग काय राहिलं ? आन्तोनसाहेबांनी माझ्यासारखी काही मुलं कॉलनीत अवश्य ठेवावीत, नाही तर तुझ्यासारख्यांचा भलेपणा उठून दिसणार नाही !'

'मूर्ख आहेस झालं! जगात अनेक देश असे आहेत की, जियं चोर अजिबात नाहीत ! मी वाचलेलं आहे. डेन्मार्क, स्वीडन व स्वित्झर्लंड या देशांत कधीही चोऱ्या होत नाहीत !' बेलुखिन म्हणाला.

'हे साफ खोटं आहे !' चाचरत बेर्शनेव म्हणाला, 'तियंही चोऱ्या होतात; बरं, नसल्या होत तर काय मोठंसं ? डेन्मार्क आणि स्वित्झर्लंड हे काही मोठे गाजलेले देश नव्हेत !'

'आपल्या देशाबद्दल काय म्हणणं आहे ?'

'आपण आणि आपला देश ? आपण केवढा इतिहास घडवला, केवढी मोठी क्रांती केली !'

'पण तुझ्यासारखे नादान लोकच क्रांतीचे शत्रू असतात !' बेलुखिन म्हणाला.

या असल्या वादविवादामुळे कारबानोवचे डोके उठत असे. तो आपल्या बिछान्यातून बाहेर येई व बेलुखिनकडे जळजळीत नजरेने बघत असे. रागारागाने त्याला विचारी, 'मी किंवा मिट्यागिननं थोडीशी ब्रेड काढली तर काय क्रांतीचं नुकसान होणार आहे ? तू नुसता ब्रेडची लांबी मोजत बस !'

यावर बेलुखिनही चिडून बोले, 'सोडा त्या ब्रेडच्या तुकड्यांची गोष्ट. अरे, तुम्ही सारा वेळ कुठं हात मारायला मिळतो का याचाच विचार करीत असता ते फार वाईट !'

उन्हाळ्याच्या शेवटी शेवटी मिट्यागिन आणि त्याचे सहकारी यांच्या हालचाली जास्तच जोराने चालू झाल्या. आमच्या भागात कलिंगडाची खूप लागवड होत असे. यंदाच्या वर्षी तर आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी चिक्कार कलिंगड लावली होती.

या कलिंगडांच्या चोऱ्या मधूनमधून चालूच असत. कलिंगडांची चोरी करणे हा काही फार मोठा गुन्हा मानला जात नसे. गावातली पोरं सर्रास कलिंगडं चोरायचे काम करीत; परंतु या चोऱ्यांबद्दल शेतकरीही कधी फारशी कुरकूर करीत नसत. हजारो कलिंगडे झाली आणि शभर–दोनशे गेला तरी कोणी कधी फारशी किरकिर करीत नसे. उलट कलिंगडांच्या मोसमात शेतामध्ये झोपडी उभारली जात असे. रखवाली करायला बसणारा माणूसही मुद्दाम आल्या-गेलेल्याला बोलावून आग्रहाने कलिंगड खायला लावीत असे.

या रखवालदारांपैकी मधूनमधून कोणी तरी येऊन आमच्या मुलांच्या कागाळ्या करीत असे. 'तुमची मुलं चोऱ्या कशाला करतात ? त्यांना म्हणावं, माझ्याकडे या ! मी तुम्हाला उत्तमपैकी कलिंगड खायला घालीन !'

मी याचा डॉरमिटरीत एकदा उल्लेख केला. तेव्हा ते आमंत्रण मुलांनी आनंदाने स्वीकारले व रखवालदारांना दिलेल्या उत्तम उत्तम कलिंगडांचा समाचार घेतला. कलिंगडे खाता खाता पीक-पाण्याच्या गप्पाही चालत. पिशव्या भरून लोक कलिंगडे घरी पण घेऊन जात. पहिल्या दिवशी आलेल्या बोलावण्याला बेलुखिननेच जावे असा बेर्शनेवने आग्रह धरला व इतरांनीही त्याला दुजोरा दिला. त्या दिवशी बेलुखिन कलिंगडांचा भरपूर समाचार घेऊन परत आला. त्याने आल्यावर खाल्लेल्या कलिंगडांची व यजमानाची तोंडभर स्तुती केली.

बर्शनेव शांतपणाने बेलुखिनचे भाषण एकत असता कारबनोव तेथे आला. त्याने बेलुखिनला विचारले,

'काय, कशी काय झाली कलिंगडांची मेजवानी ?'

'छानच झाली ! आपण आपल्या शेजाऱ्यांशी खरोखरच चांगले संबंध ठेवले पाहिजेत !' बेलुखिन म्हणाला.

'हो, जरूर. तूच एकदा त्यांच्याकडे जा !' असे दोघेही त्याला म्हणाले.

'आपल्याला कोणी बोलावलं तर काही सगळ्यांनीच तेथे जायचं असतं का ? ते फारच वाईट दिसेल. आपण काय थोडेजण आहोत ? चांगले साठजण आहोत !'

दुसऱ्या दिवशीही बर्शनेवने बेलुखिनलाच जायचा आग्रह केला. बेलुखिनने अगदी मोठेपणाने सांगितले, 'दुसऱ्या कोणाला तरी पाठवा !'

त्यावर बर्शनेव म्हणाला, 'दुसरा कोणी नको. तूच जा ! तू पाहिजे तर कलिंगडं खाऊ नकोस. फक्त गप्पा मारत बस !'

बर्शनेवचे म्हणणे बेलुखिनला खरे वाटले; पण नुसत्या गप्पा मारण्यास काहीच हरकत नाही, हे त्याला पटले. म्हणजे आपण फक्त खाण्यासाठीच येतो असे रखवालदाराला वाटू नये; परंतु आज त्या म्हाताऱ्या रखवालदाराने बेलुखिनचे अगदी थंड स्वागत केले. आपला जाण्याचा हेतू स्पष्ट करण्याची संधी बेलुखिनला मिळाली नाही.

'हे पाहिलंस ना माझ्या हातात काय आहे ?' असे म्हणत रखवालदाराने आपल्या हातातल्या बंदुकीकडे बोट दाखवले. 'तू चांगलाच बदमाश दिसतोस ! मला इथं गप्पात गुंतवून ठेवलंस आणि तिकडे तुझ्या साऱ्या मित्रांनी माझ्या अर्ध्याअधिक कलिंगडांचा फडशा उडविला. याद राख, मी तुला चांगलाच धडा शिकवीन !'

बेलुखिनला आश्चर्याचा धक्काच बसला. तो कॉलनीत परत आला. रात्री डॉरमिटरीत त्याने झालेली हकीकत जोरजोराने सांगायला सुरुवात केली.

सारी पोरं पांघरुणाच्या आडून हसत होती. मिट्यागिनने शांतपणाने त्याला विचारले, 'म्हाताऱ्या रखवालदारानं तुला आपलं वकीलपत्र दिलंय काय ? तू तर त्याच्या घरातच बसून कलिंगडं खाल्लीस. आम्ही तर अजून एकही कलिंगड पाहिलंसुद्धा नाही ! त्याची कलिंगडं आम्हीच चोरली याला काय पुरावा आहे ?'

तो म्हातारा रखवालदार माझ्याकडे तक्रार घेऊन आला नाही; परंतु रोजच्या रोज कलिंगडांची खूपशी चोरी होत असावी असे मला खात्रीने वाटत होते.

एके दिवशी सकाळी डॉरमिटरीत सबंध जमिनीवर कलिंगडांच्या बिया पसरलेल्या दिसत होत्या. मी मॉनिटर्सना दम भरला. काही मुलांना शिक्षा केली आणि अशी घाण पुन्हा कधीही रहाता कामा नये, असेही सांगितले. खरोखर काही दिवस डॉरमिटरीत घाण दिसली नाही.

उन्हाळ्यात संध्याकाळच्या वेळी वाऱ्याची झुळूक येत असे. अशा वेळी कॉलनीत हास्याची खसखस पिकलेली ऐकू येई व एकदम सारे वातावरण गंभीर होऊन जात असे.

पाइन आणि मिंट झाडांचा मंद सुवास दरवळत असे. पक्ष्यांचे




# दारू, एक सामाजिक शाप आहे

## त्यामुळे आपले आरोग्य आणि संसार धुळीला मिळतो.

इतर कोणत्याहि
दुष्कृत्यापेक्षा दारूने अधिक
संसार उध्वस्त केलें आहेत.

केवळ गंमत म्हणून अथवा
संगत म्हणून दारू पिणारा
माणूस, नकळत एका भीषण
सापळ्यात अडकत असतो.

प्रथम आपणांस दारूची संवय लागते.
त्यानंतर ती आपले शरीर पोखरते.
आपले लीव्हर काम करीत नाही,
हृदय दुर्बल होते आणि रक्तात विष पसरते.



**दारूची गुलामी पत्करण्यापूर्वीच या संवयीपासून दूर रहा.**

**या इशाऱ्याचे महत्व ओळखा**

davp 78/494

आवाज मधूनमधून येत असत. रात्रीच्या वेळी कुत्र्यांचे ओरडणे लांबून कुठून तरी ऐकू येई. अशाच एका रात्री मी माझ्या खोलीच्या बाहेर व्हरांड्यात उभा होतो. आमचा रात्रपाळीचा मॉनिटर पहारा करीत होता. त्याने मला सहजच वेळ विचारली. सारे काही शांत होते; पण ही शांतता मला कशीशीच वाटली.

दुसऱ्या दिवशी इवानोविचने एकाएकी मला विचारले, 'घोड्यांना रात्री मोकळं सोडायचा तुम्ही हुकूम दिला काय? ते चोरीला नाही का जाणार?'

ब्राटचिन्कोने मध्येच तोंड घातले, 'घोड्यांना काय मोकळी हवा नको मिळायला?'

मी गप्पच होतो.

दुसऱ्या दिवशी पुन्हा कालिनासाहेबांनी वेगळ्या तऱ्हेने तोच प्रश्न विचारला, 'काय, घोडे आज-काल खिडकीतून वाकून डॉरमिटरीत काय बघत असतात?'

'तुमच्या म्हणण्याचा अर्थ मी नाही समजलो.'

'मग तुम्ही स्वतःच जाऊन पहा ना, म्हणजे तुम्हाला काय ते समजेल!'

मी स्वतः पाहून खात्री करून घेतली. त्यांनी सांगितलेले अगदी खरे होते. पब्लिक एज्युकेशन डिपार्टमेंटने त्यांना नकोसा झालेला एक बैल आम्हाला दिला होता. तो बैल व आमचे घोडे पहाटेच्या वेळी डॉरमिटरीच्या खिडक्यांखाली कशाची तरी वाट बघत उभे होते.

मी तसाच डॉरमिटरीत गेलो आणि मुलांना हा काय प्रकार आहे म्हणून विचारले.

आप्रिश्को बिछान्यात उठून बसला आणि त्याने हसत हसत ओरडून सांगितले, 'कोणी तरी जा रे आणि त्या घोड्यांना विचारा ते इथे कशासाठी उभे आहेत!'

पांघरुणाच्या खालून मुलांच्या खिदळण्याचे आवाज हळूहळू येत होते.

मिट्यागिन उठून बसत म्हणाला, 'हे असले चौकस घोडे कॉलनीत ठेवणं चुकीचंच आहे. आन्तोनसाहेब, तुमच्या डोक्याला आणखी ही कटकट कशाला?'

मी ब्राटचिन्कोवर ओरडलो, 'दररोज सकाळी हे घोडे इथे कशासाठी उभे असतात?'

बेलुखिनने मध्येच सांगितले, 'आन्तोनसाहेब, मी सांगतो. घोड्यांना काहीही इजा होणार नाही! ब्राटचिन्को दररोज स्वतः हे घोडे इथे आणून सोडत असतो.'

'बस कर तुझी वटवट!' कारवानोव म्हणाला, 'आन्तोन, मी तुम्हाला खरं सांगतो. तुम्ही आम्हाला कलिंगडाच्या बिया व साली डॉरमिटरीत टाकायच्या नाहीत असं सांगितलं होतं; परंतु रोजच कुणाजवळ तरी कलिंगडं असतातच!'

'याचा अर्थ काय?' मी विचारले.

'म्हणजे कधी कधी आम्हाला म्हातारा रखवालदार कलिंगडं देतो किंवा कोणी तरी शेजारच्या गावातनं कलिंगडं घेऊन येतं आणि मग बिया व साली कोठे फेकणार? म्हणून आम्ही त्या घोड्यांना त्याची मेजवानी देतो!'

मी काही न बोलता डॉरमिटरीतून बाहेर पडलो. संध्याकाळी जेवणे झाल्यावर मिट्यागिन एक भले मोठे कलिंगड घेऊन माझ्याकडे आला. 'आन्तोनसाहेब, हे खाऊन बघा!'

मी त्याला विचारले, 'कुठून आणलं हे? ते आणलंस तसंच घेऊन जा! मला तुम्हा सर्वांना चांगला धडा शिकवायला पाहिजे!'

यावर मिट्यागिन म्हणाला, 'हे कलिंगड आम्ही चोरून आणलेलं नाही. म्हाताऱ्या रखवालदारानं ते खास तुमच्यासाठी दिलंय! ते आम्ही पैसे देऊन विकत आणलंय आणि खरोखरीच तुम्ही आम्हाला जरूर शिक्षा करा. आम्हाला राग येणार नाही!'

'तू ते कलिंगड घेऊन इथून निघून जा!' असे मी त्याला निक्षून सांगितले.

थोड्या वेळाने मुलांचा एक घोळका ते कलिंगड घेऊन परत माझ्या ऑफिसात आला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे बेलुखिन हा त्यांचा म्होरक्या होता. त्याला बोलताना हसू आवरत नव्हते, तो म्हणाला,

'आन्तोनसाहेब, हे सारे चोर रोज कलिंगडं खातात! लपवून ठेवण्यात काय हाशील आहे? ते जाऊ द्या, पण ते कलिंगडं कशी कशी मिळवतात हा मुख्य मुद्दा! मला ते दररोज कलिंगडं खाऊ घालतात. मला कलिंगडं फार आवडतात हे त्यांना पक्कं माहीत आहे. आपल्या मुलींनासुद्धा कलिंगडं मिळतात आणि फक्त तुम्हालाच ती मिळत नाहीत, हे आम्हाला माहीत आहे. तुमच्या वाट्याला फक्त या कलिंगडांमुळे वाईटपणा मात्र आला; म्हणून आम्ही सारेजण तुमची क्षमा मागतो आणि तुम्हाला हे कलिंगड खाण्याची विनंती करतो. मी या वेर्शनेवसारखा लुच्चा नाही हे तुम्हाला माहीत आहे. मी हे कलिंगड कामाच्या मोबदल्यात पैसे देऊन विकत आणलंय. इकॉनॉमिक पोलिटिक्समध्ये सांगितल्याप्रमाणे जास्त किंमत देऊन आणलंय!'

असे म्हणून बेलुखिनने ते कलिंगड माझ्यापुढे ठेवले आणि तो गंभीरपणे बाजूला उभा राहिला.

मिट्यागिनच्या मागून डोकावून बघत वेर्शनेवने बेलुखिनची दुरुस्ती केली, 'एकॉनॉमिक पॉलिटिक्स नव्हे, पोलिटिकल एकॉनमी.'

'तेच, तेच!'

'तुम्ही हे कसं विकत घेतलंत?' मी विचारलं.

कारावानोव पुढे सरसावला. तो बोटे घालून काय काय किंमत दिली ते सांगू लागला, 'हे पहा, त्या म्हाताऱ्या रखवालदाराच्या भांड्याला वेर्शनेवनं दांडा लावून दिला. गुडनं त्याचा बूट दुरुस्त करून दिला व मी अर्धी रात्र त्याच्या शेताची राखण केली.'

'त्या अर्ध्या रात्रीत तुम्ही किती कलिंगडं पळवली असतील याची मला चांगली कल्पना आहे!'

'अगदी बरोबर बोललात!' बेलुखिन म्हणाला.

'मी याचं उत्तर देतो. आम्ही त्या म्हाताऱ्या रखवालदाराजवळ अलीकडे दोस्ती केली आहे; पण जंगलाच्या पलीकडे कलिंगडाचं आणखी एक शेत आहे. तिथला रखवालदार भयंकर माणूस आहे! तो केव्हाही मारायला तयार असतो!'

'छान! तुम्ही तिथेही धाड घालायला सुरुवात केलीत का?'

'नाही, नाही! मी तिकडे जात नाही; पण कधीकधी बंदुकीचे आवाज ऐकायला येतात.'

कलिंगडांबद्दल मी मुलांचे आभार मानले.

काही दिवसांनी तो भयंकर माणूस अतिशय विमनस्क मनःस्थितीत माझ्याकडे आला. तो म्हणाला, "तुम्ही तुमच्या मुलांना काही आळा घालू शकता का ? इतके दिवस ही मुलं रात्रीची येऊन चोऱ्या करीत; पण आता दिवसाढवळ्या हे शेतात घुसतात! एकाच्या मागं लागलं तर बाकीचे सुटून जातात !'

मी मुलांना बोलावून सांगितले, 'हे पहा, मी स्वतःच आजपासून कलिंगडांची रखवाली करायला जाणार आहे किंवा कॉलनीच्या खर्चातून मी एक रखवालदार याला देतो.'

मिट्याशिन म्हणाला, 'याच्या शब्दावर विश्वास ठेवू नका! हा मनुष्य शेताच्या आसपास जराही कुणाला फिरकू देत नाही!'

'पण तुम्ही तिकडे जाताच कशासाठी ? तुमचं काय काम ?'

'पण आम्ही कुठं जातो आणि काय करतो याच्याशी या रखवालदाराला काय कर्तव्य आहे ?'

एक दिवस वेलुखिन मला येऊन म्हणाला, 'आन्तोन, या साऱ्याचा शेवट काही चांगला होणार नाही! म्हातारा रखवालदार अलीकडे शेतात बसायला घाबरतो. त्यानं आणखी दोघांना आपल्याबरोबर घेतलं आहे. शिवाय त्या साऱ्यांजवळ बंदुका असतात. आपली मुलं तर हट्टाला पेटलेली दिसतात आणि त्या लोकांनी गोळ्या चालवल्या तर काय होईल ते तुम्हीच पहा!"

त्या दिवशी रात्री आमची मुले कलिंगडाच्या शेतात घुसली. त्यांना दिलेल्या जुजबी सैनिकी शिक्षणाचा उपयोग झाला. जवळजवळ अर्धी मुले शेताच्या कडेने पसरली होती. रखवालदारांनी हाळी मारताच मुलांनी त्याला प्रत्युत्तर दिले आणि ती एकदम चाल करून गेली. ते सारे रखवालदार बंदुका तिथेच टाकून जंगलात पळून गेले. काही मुले कलिंगडे तोडून खाली फेकू लागली. काही जणांनी झोपडीला आग लावली. कोणी एक रखवालदार कॉलनीत आला आणि त्याने मला उठवले. मी घाईघाईने त्याच्याबरोबर त्या छोट्याशा लढाईच्या जागी गेलो.

ती सबंध झोपडी पेटत होती. आम्ही शेताच्या रोखाने जात होतो. त्या वेळी बंदुकीचे आवाज ऐकायला आले. काही मुले शेतात आडवी झालेली मला दिसली. मधूनमधून ती मध्येच उभी राहत. शेताच्या उजव्या बाजूला मिट्याशिन उभा राहून 'सरळ जाऊ नका !' अशा सूचना देत होता.

'बंदुकीचे आवाज कुठून येत आहेत ?' मी त्या म्हाताऱ्या रखवालदाराला विचारले.

त्यावर तो म्हणाला, 'मलाही समजत नाही. झोपडीत तर कोणी नसावं. बहुधा बंदूक तशीच टाकून ते गेले असावेत आणि बंदुकीच्या गोळ्या आपोआप सुटत असाव्यात !'

थोड्या वेळाने सगळे शांत झाले. मुले कुठल्या कुठे नाहीशी झाली होती. तो म्हातारा रखवालदार आपल्या घरी गेला आणि मी पण कॉलनीत परत आलो. मुले नुसतीच झोपलेली नव्हती तर ती मोठमोठ्याने घोरत होती. असे घोरणे यापूर्वी मी कधीच ऐकले नव्हते !

'हे घोरण्याचं नाटक बस करा आणि सगळेजण उठून बसा!'

पण कोणीही उठण्याचे चिन्ह दिसेना. घोरणे तेवढे थांबवले होते. मी पुन्हा एकदा जोरात उठण्याची सूचना दिली. हळूहळू पांघरुणातून थोडा डोकी बाहेर आली. मिट्याशिन डोळे विस्फारून माझ्याकडे बघत होता. जणू काही झालेच नाही अशा थाटात 'काय झालं ?' असे त्याने मला विचारले; पण काराबानोवला राहवले नाही. तो म्हणाला, 'बस कर मिट्याशिन !'

सारेजण उठून माझ्याभोवती गोळा झाले व थोड्या वेळापूर्वी झालेल्या गोष्टीचे रसभरित वर्णन करू लागले. तारानेट मध्येच कोणी तरी चावल्यासारखा उडी मारून उठला व म्हणाला, 'त्या झोपडीत काय बंदुका होत्या ?'

'हो, पण त्या जळून गेल्या !'

'नाही रे, लाकूड तेवढं जळालं. बाकी सगळं उपयोगात आणता येईल !' यावर तारानेट उठून डॉरमिटरीच्या बाहेर निघून गेला.

मी गंभीरपणाने बोलायला सुरवात केली.

'हे बघा, तुमच्या दृष्टीनं ही एक मोठी गंमत असेल; पण ही शुद्ध दरोडेखोरी आहे! मला यापुढं हे सहन करणं शक्य नाही ! तुम्हाला जर हे असंच चालू ठेवायचं असेल तर आपण एकमेकांना रामराम ठोकू या ! रात्रंदिवस कॉलनीत व आजूबाजूच्या भागात तुमच्या वर्तनामुळं झाली एवढी बदनामी बस झाली !'

काराबानोवनं माझा हात धरला आणि तो म्हणाला, 'मी शपथ घेऊन सांगतो की, पुन्हा असं घडणार नाही ! आम्ही फारच वाहावत गेलो होतो !'

सगळ्यांनी त्याच्या म्हणण्याला माना डोलावल्या.

'यात काही अर्थ नाही. मी म्हटले, 'ही तुमची नुसती पोकळ आश्वासनं मला नकोत. मी तुम्हाला आजपर्यंत अनेकदा सूचना दिल्या. अशानं मला काही जणांना कॉलनीतून हाकलून काढावं लागेल ! हा माझा शेवटचा इशारा आहे !'

दुसऱ्या दिवशी गाड्या शेताकडे गेल्या व जळून राहिलेले सामान घेऊन आल्या.

माझ्या टेबलावर बंदुकीचे उरलेसुरले भाग येऊन पडले होते. ¤

## प्रकरण बाविसावे

# विच्छेदन

कबूल केल्याप्रमाणे मुलांनी व त्यांचे म्होरके काराबानोव व मिट्याशिन यांनीही कलिंगडांच्या शेतावर धाडी घालण्याचे, तसेच गावकऱ्यांच्या साठवणुकीवर डल्ला मारायचे थांबवले नाही. अखेरीस त्यांनी एक विचित्र बनाव बनवून आणला. त्याचे पर्यवसान काही चांगल्या गोष्टी व काही वाईट गोष्टी घडण्यात झाले.

एका रात्री त्यांनी लूका सेमियानोविचच्या बागेत धाड घातली आणि मधाची दोन पोळी मधमाशांसकट कॉलनीत आणली. ती आणून त्यांनी रात्रीच्या वेळेला चामड्याचे काम चालत असे त्या खोल्यात ठेवली. या मेजवानीत बऱ्याच मुलांनी भाग घेतला. भाग घेणाऱ्यांची यादी व्यवस्थित तयार करता आली. कारण प्रत्येकाचे

तोंड सुजून लाल झालेले होते. लेशीही त्यातून सुटला नाही. तो नेहमीप्रमाणे एकातेरीनावाईंच्याकडे मलमपट्टी करण्यासाठी गेला. त्या वेळी हा सगळा प्रकार उघडकीला आला.

मिटचागिनला ऑफिसमध्ये बोलावून विचारले असता त्याने 'हे सर्व कर्तृत्व आपलं एकटयाचंच आहे' असे सांगितले व त्याने आपल्या सहकाऱ्यांची नावे सांगण्याचे नाकारले आणि 'त्यात एवढं रागावण्यासारखं काय आहे?' असे उलट आश्चर्याने विचारले. तो म्हणाला, 'आम्ही ती पोळी मध खाण्यासाठी आणली नसून माशा पाळण्यासाठी आणली आहेत. तुम्ही नको म्हणत असलात तर ती मी परत देऊन टाकीन!'

'परत काय देणार, कपाळ? मध खाऊन टाकलाय आणि माशा उडून गेल्यात!'

यावर तो शांतपणे म्हणाला, 'जशी तुमची मर्जी! मी ते चांगल्या हेतूनं केलं होतं.'

'हे पहा मिटचागिन, तू कॉलनी सोडून जाणं हेच उत्तम असं मला वाटू लागलंय. तू तसा आता जाणता आहेस. तुझं आणि माझं पटणं मला अशक्यच वाटतंय. आपण एकमेकांचा निरोप घेणं हेच उत्तम.'

'तुमचं म्हणणं मला मान्य आहे.' तो शांतपणे मला म्हणाला.

मिटचागिनला शक्य तितक्या लवकर काढून लावणे अत्यंत जरूरीचे होते. मी आतापर्यंत चालढकल करीत होतो; परंतु यापुढे डोळेझाक करून चालणार नव्हते. त्यामुळे कॉलनीतली सर्वच मुले हळूहळू हाताबाहेर गेली असती. कलिंगडांच्या शेतावर धाडी घालणे किंवा मधाची पोळी काढून आणणे हे जरी फार मोठे गुन्हे नसले तरी मुलांचे लक्ष याच गोष्टींवर जास्तीत जास्त केंद्रित व्हायला लागलेले होते. रात्रंदिवस हाच विचार त्यांच्या डोक्यात घोळत असे. त्यामुळे कुठच्याही चांगल्या गोष्टी त्यांच्या हातून घडण्याचे लक्षण दिसेना. याचा परिणाम म्हणजे त्यांची सर्वांगीण वाढच जणू खुंटल्यासारखी झाली होती. बारकाईने पहाणाऱ्याला या खुजेपणात आणिकही गोष्टींची भर पडत चाललेली लक्षात येण्यासारखी होती. उदा. उद्धटपणा, बेफिकिरी व बेजबाबदारी यांसारख्या अवगुणांची वाढ व्हायला लागली होती. झादारोव व बेलुखिनसारखे आमचे खंदे आधारस्तंभ स्वतः जरी चोरी-चहाडीत भाग घेत नसले तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची झलक कमी व्हायला लागली होती. राजकीय विषयांच्या पुस्तकांचे आमचे वाचन संपुष्टातच आले होते नी त्याऐवजी मुलांच्या हातात कसली तरी नादान, साहसी विषयावरील पुस्तके दिसू लागली होती. तसल्याच पुस्तकांवर त्यांचे वाचन व चिंतन चालत होते. या सगळ्याचा कॉलनीच्या एकंदर दैनंदिन कार्यक्रमावर वाईट परिणाम होत होता. कॉलनीचे सगळे वातावरण बिघडूनच गेले होते. हळूहळू अस्वच्छता, गबाळेपणा भरपूर दिसू लागला होता.

मी मिटचागिनसाठी सुटकेचा हुकूम लिहिला. 'मी ओडेसाला जाणार आहे' तो म्हणाला. मी त्याला वाटखर्चाला पाच रुबल दिले. पुढचे आयुष्य सुखाचे जावो अशी सदिच्छा व्यक्त केली.

'मी मुलांना शेवटचं भेटू का?' मिटचागिनने विचारले.

'हो. जरूर भेटून जा!' मी सांगितले.

मिटचागिनचा निरोपसमारंभ कसा झाला तो मला माहीत नाही; पण तो बऱ्याच उशीरा कॉलनीतून बाहेर पडला. सबंच्या सर्व मुले त्याला फाटकापर्यंत पोचवायला गेलेली दिसली.

त्या रात्री सगळी मुले उदासीन दिसत होती. कारावानोव एक पेटी घेऊन ती साफ करीत भंडारखोलीच्या बाहेर बऱ्याच उशीरापर्यंत बसून राहिला होता.

रात्री लेशी माझ्या ऑफिसमध्ये आला. तो म्हणाला, 'मिटचागिन गेल्यामुळं कसं सुनंसुनं वाटतंय, नाही?'

मी त्यावर काहीही प्रत्युत्तर केले नाही. तो बराच वेळ थांबला आणि आला तसा निघून गेला.

त्या रात्री मी खूप उशीरापर्यंत माझ्या खोलीत बसून लिहीत होतो. रात्री २ वाजता मी झोपायला जाण्यासाठी उठलो. घोड्यांच्या तबेल्यात मला दिव्याचा अंधुक उजेड दिसला. मी ब्राटचिन्कोला उठवून विचारले की, 'तबेल्यात माळ्यावर कोण बसलं आहे?'

त्याने नाखुषीनेच उत्तर दिले, 'कदाचित मिटचागिनच बसलेला असेल!'

'तो अजून इथं कसा?' मी विचारले.

'मला काय माहीत?' असे ब्राटचिन्को म्हणाला.

मी माळ्यावर चढून पाहिले तेव्हा दिव्यासभोवती बरीच मंडळी बसलेली दिसली— वोल्कोव, लेशी, प्रिखोदकोव, असादची, कारावानोव व मिटचागिन. त्या सर्वांनी माझ्याकडे फक्त शांत नजरेने बघितले. मिटचागिन काही तरी करीत होता; पण अपुऱ्या उजेडामुळे मला ते नीटसे दिसले नाही.

'खाली उतरून तुम्ही सारेजण माझ्या ऑफिसात या!' असे मी त्यांना सांगितले.

माझ्या ऑफिसच्या दरवाजाशी आल्यावर कारावानोव म्हणाला, 'सर्वांनी आत येण्याचं काही कारण नाही. मी आणि मिटचागिन काय ते सांगू!'

मी याला काही विरोध केला नाही. आत गेल्यावर कारावानोवने बैठक मारली; पण मिटचागिन मात्र एका कोपऱ्यात उभा राहिला. मी मिटचागिनला विचारले,

'तू कॉलनीत परत का आलास?'

'काही नाही. एक काम पुरं करायचं होतं.'

'कसलं काम होतं?' मी विचारले.

'छोटंसंच काम होतं.' मिटचागिन म्हणाला.

इतक्यात कारावानोव उठून माझ्या टेबलाजवळ आला. टेबलावर दोन्ही हात टेकवून जळजळीत डोळ्यांनी माझ्या डोळ्यांत बघत म्हणाला, 'काय काम होतं सांगू आन्तोन?' मी पण मिटचागिनबरोबर कॉलनी सोडून जाणार आहे!'

'पण तुम्ही माळ्यावर बसून काय करीत होतात त्याचं आधी उत्तर द्या!'

'तसं विशेष काहीच नाही!' असे कारावानोवने उत्तर दिले. 'पण खरं सांगू, मी व मिटचागिन तुमच्या कॉलनीच्या शिस्तीत बसत नाही म्हणून मी पण मिटचागिनबरोबर जात आहे. आम्ही कुठंही आमचं नशीब काढू! आमच्या जागी तुम्ही चांगली मुलं अवश्य भरती करा!'

कारावानोव नेहमीच असा अभिनय करीत असे. आताही आपण दुखावलो गेलो आहो असे उगीचच तो दाखवीत होता. मिटचागिन-

वर मी अन्याय करतो आहे असेच जणू त्याला भासवायचे होते व कदाचित मी कॉलनीत राहू द्यायची परवानगी देईन असे त्याला वाटत असावे.

मी काराबानोवकडे पहात परत तोच प्रश्न केला, 'तुम्ही माळ्यावर बसून काय करीत होता?'

काराबानोवने मिटचागिनकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. मी उठून काराबानोवजवळ गेलो.

'तुमच्या खिशात पिस्तूल आहे काय?' मी विचारले.

'मुळीच नाही!' काराबानोवने जोरात म्हटले, 'तुम्ही काय माझी झडती घेणार आहात काय, आन्तोन?' त्याने मला विचारले.

'तुमचे खिसे मोकळे करून दाखवा!' असा मी त्यांना शांतपणाने हुकूम केला.

'बघा, बघा काय बघता ते!' असे म्हणून चिडून काराबानोवने सारे खिसे मोकळे केले, तेव्हा थोडे भाकरीचे तुकडे त्याच्या खिशातून बाहेर पडले.

मी मिटचागिनच्या जवळ गेलो आणि खिसे खाली करण्यास त्याला हुकूम केला.

मिटचागिनने खिसे खाली करायचे नाटक केले आणि त्यातून एक छोटेसे चामड्याचे पाकीट, एक किल्ल्यांचा जुडगा बाहेर काढला आणि निर्लज्जपणे हसत, 'झालं समाधान?' असे मला विचारले.

मी त्याच्या पॅन्टच्या पट्ट्याला हात घातला आणि एक मध्यम आकाराचे पिस्तूल काढले. त्यात तीन काडतुसे होती. ते हातात धरून मी 'हे कुणाचं आहे?' असे त्या दोघांनाही विचारले.

'ते माझं पिस्तूल आहे!' काराबानोव म्हणाला.

'तुम्ही का खोटं बोललात? ठीक आहे. तुम्ही दोघांनी कॉलनी सोडून जाणंच योग्य आहे!' मी लगेच काराबानोवच्या सुटकेचा हुकूम लिहिला. त्याने तो हुकूम घेतला; पण पाच रुबल्स मात्र घेण्याचे नाकारले. तो म्हणाला,

'मला त्याची गरज नाही!'

त्याने अभिवादन करण्यासाठी आपला हात माझ्यापुढे केला. त्याचा हात थरथरत होता. त्याला काही तरी सांगायचे होते; पण सांगता येत नव्हते. तो घाईघाईने बाहेर पडला आणि अंधारात दिसेनासा झाला. मिटचागिन मात्र पक्का बेरकी! त्याने अभिवादन केले नाही. त्याने आपले खिसे नीट केले व काही न बोलता खांदे उडवीत काराबानोवच्या मागोमाग तो बाहेर पडला.

मी दरवाजाच्या बाहेर आलो. मुलांचा घोळका बाहेर जमलेला होता. लेशी जाणाऱ्या दोघांच्या पाठोपाठ फाटकापर्यंत गेला. ब्राटचिन्को काही तरी पुटपुटत पायरीवर उभा होता. बेलुखिनने त्या भयाण शांततेचा भंग केला, 'झालं ते फार उत्तम झालं. हे एकदा केव्हा तरी व्हायलाच हवं होतं!'

त्यावर बेर्शनेव अडखळत म्हणाला, 'योग्य असेल रे; पण मला त्याच्याबद्दल वाईट वाटतंय!'

'कुणाबद्दल वाईट वाटतंय?' मी विचारले.

'तेच. काराबानोव आणि मिटचागिनबद्दल.'

'मला तुझीच कीव येते. तू अगदी मूर्ख आहेस! मिळालेल्या शिक्षणाचा तुझ्या डोक्यावर काही परिणाम झालला नाही!' वलुखिन बेर्शनेवला म्हणाला.

दोन दिवस या गेलेल्या मुलांबद्दल काही ऐकले नाही. काराबानोवचा बाप स्टारत्झोवोए गावात रहात होता. तो आपल्या बापाकडे जाईल याबद्दल शंका नव्हती; पण मिटचागिनच्या भवितव्याबद्दल मला शंका होती. तो रस्त्यातून भटकत बारीकसारीक चोऱ्या करून नक्कीच एखाद्या जेलमध्ये जाऊन पडेल किंवा एखाद्या मोठ्या लफड्यात सापडून सहा वर्षे जेलमध्ये जाईल किंवा दरोडेखोरांच्या टोळीकडून मारला जाईल. कदाचित फाशीची शिक्षा होईल! त्याला दुसरा काही मार्गच नव्हता. वाईट एवढेच की, तो कदाचित काराबानोवला आपल्यावरोबर भागीदार करून घेईल. दोघेही वाटमारी करीत रहातील. नाही तरी एके काळी काराबानोव वाटमारी करीत होताच.

दोन दिवसांनी कॉलनीत एक बातमी उठली की, काराबानोव आणि मिटचागिन शहराकडे जाणाऱ्या मोठ्या रस्त्यावर वाटमारी करीत आहेत. त्यांनी नुकतेच जवळच्या खेड्यातल्या खाटिकांना लुटले आहे.

'तुम्हाला कोणी सांगितलं हे?'

'शेजारच्या गावातल्या दूधवालीनं ही बातमी आणली.' असे मुले आपआपसात कुजबुजत असत. कोणीही जवळ गेला की, एकदम गप्प रहात. मोठ्या मुलांनी अभ्यास करायचे सोडूनच दिले होते. दोन-दोन तीन-तीन जण मिळून आपापसात कुजबुजत.

शिक्षकमंडळी गेलेल्या दोन्ही मुलांचा उल्लेख करायचे टाळीत; पण एक दिवस लिडियाबाई म्हणाली, 'काही असलं तरी ती दोघं गेली म्हणून वाईट वाटणं साहजिकच आहे.'

मी गंमतीने तिला म्हटले, 'आपण एक ठरवू या. ते गेल्याबद्दल तू भरपूर दुःख व्यक्त कर; पण ते माझ्यासमोर मात्र नको, एवढंच!'

'बरं बुवा!' ती जरा घुश्श्यातच म्हणाली.

चारपाच दिवसांनंतर मी व ब्रॉटचिन्को शहरातून परत येत होतो. ब्राटचिन्को खाली मान घालून काही तरी विचार करीत माझ्या शेजारी गाडीत बसला होता. रेडला गेल्या उन्हाळ्यात भरपूर खायला मिळाल्यामुळे तो गुबगुबीत झाला होता व खुषीत रस्त्याने चालत होता. आम्ही एकमेकांशी काहीच बोलत नव्हतो आम्हाला त्या निर्जन वस्तीची सवयच झाली होती. एकाएकी ब्राटचिन्कोने समोर पाहिले आणि तो ओरडला,

'आन्तोनसाहेब, समोर पाहिलंत का? आपले काराबानोव आणि मिटचागिन रस्त्याच्या मधोमध उभे आहेत!'

मी पाहिले तेव्हा दोन व्यक्ती दिसत होत्या. ब्राटचिन्कोने त्यांना बरोबर ओळखले होते. त्याला कसेसेच वाटत होते. तो माझ्याकडे बघून म्हणाला,

'तुम्ही तुमचं पिस्तुल हाताशी ठेवा. कदाचित त्याची जरुरी लागेल!'

'काही तरी खुळचासारखं बोलू नकोस!' असे मी त्याला सांगितले.

'ठीक आहे. तुम्हाला योग्य वाटेल तसं करा!'

ब्राटचिन्कोने लगाम खेचला आणि गाडी भरधाव त्या दोघांजवळ

येऊन पोचली. जवळ येताच काराबानोव म्हणाला,

'बरं झालं आपण परत भेटलो. त्या दिवशी नाही तरी आपण व्यवस्थित निरोप घेतलाच नव्हता !'

मिटचागिनने आपले नेहमीचेच बेरकी हसू आणले.

'तुम्ही इथं काय करत आहात ?' मी विचारले.

'आम्ही तुम्हाला भेटण्यासाठीच इथं रेंगाळत आहोत. कॉलनीत येण्याची तुम्ही आम्हाला मनाई केली आहे ना ? म्हणून आम्ही तिकडे आलो नाही !'

'तुम्ही ओडेसला जाणार होता ना ?' असे मी त्यांना विचारले.

'सध्या तरी आम्ही इथंच रहाणार आहोत. हिवाळ्यानंतर आम्ही ओडेसाला जाऊ !'

'तुम्ही काही काम करीत नाही का ?'

'पाहू. हळूहळू काही तरी काम करू. आन्तोनसाहेब, त्या दिवशीच्या प्रकारामुळं आम्ही तुमच्यावर रागावलो असं समजू नका. प्रत्येकाला आपलं कर्तव्य करावंच लागतं !' मिटचागिन म्हणाला.

काराबानोव खुषीत असलेला दिसला.

मी विचारले, 'तू मिटचागिनबरोबरच रहाणार आहेस का ?'

'मला आत्ताच काहीच सांगता येत नाही. मी त्याला माझ्या वडिलांकडे चल असा आग्रह करीत आहे; पण तो काही तरी सबबी सांगतोय !'

'त्याचा बाप पक्का इरसाल शेतकरी आहे. मला तसल्या लोकांचा चांगलाच अनुभव आलाय !' असे मिटचागिन म्हणाला.

ते रस्त्याच्या वळणापर्यन्त आमच्याबरोबर चालत आले आणि काराबानोव म्हणाला,

'आमच्याबद्दल मनात राग ठेवू नका हं ! आपण एकमेकांना शेवटचं आलिंगन देऊ या !'

'तू म्हणजे अगदी भलताच भावनाप्रधान आहेस हं !' मिटचामिन काराबानोवला म्हणाला.


'आणि तू काय कमी आहेस होय, मिटचागिन !'

त्यावर ते दोघेही हसले. इतक्या मोठ्याने हसले की त्यांच्या हास्याचा प्रतिध्वनी बाजूच्या जंगलातून उमटला. ते दोघे लांब जाईपर्यन्त हात हालवून दाखवीत होते.

[ क्रमशः ]


## हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?
## राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........



# नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर

आवृत्ती : तिसरी (सचित्र)

किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे

पुस्तके

# छेद

## एक सामाजिक टीकास्त्र

'छेद' हातात पडलं आणि मुखपृष्ठापासूनच पुस्तकाची वाचनीयता आणि आशयातला नेमकेपणा जाणवायला सुरुवात झाली. पांढऱ्याशुभ्र कागदावर लाल पिवळ्या व काळ्या रंगाने पानाचा एकतृतीयांश भाग व्यापलेला आणि काळ्या तीरासारख्या धावणाऱ्या एका रेषेनं संपूर्ण पांढरेपणाला एक जाणीवपूर्वक दिलेला छेद दिसतो. त्या तीराच्याच ओघात पुस्तकाचं नाव दिसतं— 'छेद : अनिल अवचट'. मुखपृष्ठही स्वतः लेखकाचंच. नावामागे 'डॉक्टर' ही उपाधी नसल्याचं कळत—नकळत लक्षात आलं आणि पान उलटायला लागलो.

अवचटांचं लिखाण हा एका विशिष्ट दिशेनं, एका विशिष्ट जाणिवेनं केलेला वैचारिक प्रवास असतो. 'वेध'मधील त्यांचा समाजाचा, सामाजिक जीवनाचा, सामाजिक संबंधांचा वेध वेधक ठरला. त्यामधून 'छेद'-मधील लेखांद्वारे समाजजीवनाला छेद देण्याचा एक धाडसी, परंतु आवेगपूर्ण प्रयत्न अनिल अवचट यांनी केला आहे.

'छेद'ला प्रस्तावना, प्रास्ताविक, दोन शब्द असल्या गोष्टींचा सोस नाही. दिसते ती एकदम अनुक्रमणिका. त्यातील शीर्षकं वाचल्यावरसुद्धा पुस्तकाची कल्पना आणि रचना एकाच दृष्टिक्षेपात येते. उदाहरणार्थ, 'महिला अधिवेशनातील कडक इस्त्री', 'सारस्वत समेलनातील सांस्कृतिक उत्खनन', 'चांभाराची चौकशी', 'मासा गिळतो माशाला' इत्यादी. लेखांची ही नुसती शीर्षकंही बरंच काही सांगतात.

अनेक चळवळींशी अवचटांचा प्रत्यक्ष संबंध आला आहे. त्यामुळे विविध प्रकारचे अनुभव त्यांच्याजवळ आहेत. हे अनुभव व्यक्त करीत असताना त्यातील जाणिवेचा भाग ते अशा काही शैलीत मांडतात की, त्यातील बोचरेपणा, खोचकपणा अधिक तीव्र स्वरूपात दिसावा या शैलीचा उपयोग अवचटांना 'छेद'मध्ये केला आहे, विशेषतः किर्लोस्करच्या अंकात प्रसिद्ध झालेला 'डॉक्टर्स जगवतात की नागवतात ?' हा गाजलेला लेख 'छेद'मध्ये अंतर्भूत आहे. त्या लेखाबरोबरच जोडलेलं 'परिशिष्ट' ही वाचनीय आहे— लेखाइतकंच ! डॉक्टर्सबरोबरच सर्वसामान्य माणसालाही जागं करण्याचा प्रयत्न या ठिकाणी लेखकाने केला आहे.

'स्त्रियांची दोन अधिवेशने' या शीर्षकाखाली 'मुस्लिम महिला एक दुर्दैव— एक झगडा' आणि महिला अधिवेशनातील 'कडक इस्त्री' हे दोन लेख आहेत. मुस्लीम महिला परिषदेच्या निमित्तानं लिहिलेल्या या लेखात मुस्लीम महिलांची वेदना, त्यांची गाऱ्हाणी त्यांच्याच शब्दात मांडली आहेत.

चांभार समाज हा आपल्या तथाकथित संस्कृतीत उपेक्षा केला गेलेला समाज. या समाजाचीही काही गाऱ्हाणी आहेत, त्यांचेही काही प्रश्न आहेत. आज चांभार समाज प्लॅस्टिक-रबर युगामुळे अडचणीत सापडला आहे. या समस्यांचा विचार होण्यासाठी मुंबईला भरलेल्या चर्मकार परिषदेचा वृत्तांत 'चांभारांची चौकशी' या शीर्षकाखाली डॉ. अवचटांनी लिहिलाय.

चांभार समाजावर होणारे अत्याचारही फार विलक्षण आहेत. जनावर मेल्यानंतर ते ओढून नेणारे बौद्ध शिकून शहाणे झालेत. चामडे महाग झाले अशी प्रत्यक्ष अडचण असणारे चांभार आपले पोट भरण्याइतके पैसेही कमावू शकत नाही. रस्त्याच्या कडेला बसणारा 'गठई' कामगार दहा पैशात कुठं अंगठा शिवून दे, खिळे मार असं करीत दिवसाकाठी २–२॥ रुपये मिळवितो. त्यात पोलिस, म्युनिसिपालिटीचे अधिकारी यांना घास तोडून द्यावा लागतो. अशा अनेक समस्यांचं आगर असणारा चांभार समाज परिषद भरवितो.

पण अशा प्रकारच्या परिषदांमधील फोलपणाही अवचट जाता-जाता सांगतात. जातींची संमेलने म्हणून याकडे लक्ष देणे अवचटांना आवश्यक वाटते. म्हणून या लेखाचा Contrast सिद्ध करण्यासाठी (की काय) त्यांनी सारस्वत संमेलनाचा वृत्तांतही लिहिलाय. एकूणच श्रीमंती थाट वर्णन करताना अवचटांची लेखणी विशेष धारदार बनते, याचा पुनः प्रत्यय याही लेखात आला.

'धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त आणि दंगलग्रस्त' या शीर्षकाखाली तीन लेख वाचायला मिळाले. कोयना धरणग्रस्तांचे अनुभव आणि त्यांच्या अडचणी या लेखात वाचायला मिळतात. या चळवळीच्या निमित्ताने अवचट आपल्याला चौफेर चौकस नजरेने पहायला लावतात. आपली नजर चौकस नसली तर ती बनविण्यात अवचटांची लेखणी तरबेज आहे.

दुष्काळग्रस्तांना एका वेळेस पिठलं-भाकरी देण्याचा अट्टाहास करणाऱ्यांची (जाता जाता) थट्टा 'मासा गिळतो माशाला' या लेखात केलीय. उदा. 'निळूभाऊंच्या (लिमये) लीडमुळे पुण्यातल्या लोकांना भलतेच उधाण आले. मुलांनी खाऊचे पैसे दिले, मुलींनी पावडर-लिपस्टिकचे दिले. तरुणांनी पिक्चरचे दिले, वृद्धांनी तपकिरीचे. त्या काळात मुले खाऊ खाईनात, वृद्ध शिंकेनात', पावडरीअभावी मुलींकडे बघवेना...इ. एकूण दुष्काळग्रस्तांना नुसतं काम देऊन भागत नाही, तर त्यासाठी मजुरी द्यावी लागते आणि तिथंच तर घोटाळा होतो. नगराध्यक्ष किंवा पंचायतीतला सरपंच यांच्याकडे मोठ्ठा घोटाळा असतो आणि मग शोषिताचे शोषण केले जाते. अर्थात मासा गिळतो माशाला, हाही एक वृत्तांतच आहे; पण इथं वाचताना बरोबर अवचट असतात, गावातली माणसं असतात. आपण त्यांच्या खूप जवळ जाऊन हे सारं बघतो, न्याहाळतो.

या सर्वांपेक्षा एक वेगळा पण सरस ठरलेला लेख म्हणजे 'दंगल : १६ मे : पुणे'. हिंदु-मुसलमान दंगली मागील कारणे शोधण्याचा प्रयत्न या लेखात अवचट करतात. हा लेख प्रासंगिक असला तरी तो पुन्हा नव्या संदर्भात वाचताना अधिक उठावदार वाटतो. दंगली असलेल्या व दंगली 'मागे' असलेल्यांच्या भेटी-गाठी घेऊन या दंगलीचं सशब्द वर्णन लेखक करतो. त्यात अंतर्गत मारामाऱ्या आणि लफडी यामुळे प्रत्येक घटनेची पार्श्वभूमी समजून त्या प्रसंगाला महत्त्व येतं.

'छेद' ही एक सोशल कॉमेंट आहे. हा छेद समाजजीवनातल्या भिंतीमधील पडक्याफुटक्या फटींतून आरपार जातो. तर झापडे लावून जगणाऱ्या तथाकथित समाजाचं दर्शनही अवचट 'छेद'मध्ये घडवतात आणि विशेष म्हणजे अवचट प्रत्येक वेळी आणि ठिकाणी आपल्याबरोबर असतात. त्यामुळेही पुस्तक अधिक वाचनीय बनते.

—मुकुंद संगोराम

छेद (लेखसंग्रह)
अनिल अवचट
प्रकाशक—नीलकंठ प्रकाशन, पृष्ठे १०४
मूल्य दहा रुपये

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# लोककथा '७८

## आधुनिक रंगभूमीवरील एक ' घटना ! '

लोककथा '७८ या नाटकाचं यश नेमकं कशाकशात आहे, या स्वरूपाचा काही विचार जेव्हा मी करतो, तेव्हा प्रामुख्यानं दोन-तीन गोष्टी नजरेसमोर येतात. एक अशी की अलीकडच्या काही वर्षांतील सामाजिक-राजकीय अनुभवांनंतर कलेच्या सामाजिक आशयविषयक बांधिलकी-संबंधीचा जो विचार आपण नव्यानं करू लागलो आहोत, त्याच्या पार्श्वभूमीवर विचारप्रेरक (stimulating) ठरेल असं हे एक नाटक नव्यानंच आपल्यासमोर आणण्यात आलं आहे. या नाटकाच्या सादरकर्त्यांच्या त्याच्याविषयीच्या भूमिकेला याच लेखात इतरत्र चौकटींच्या रूपात हेतुपुरस्सर देण्यात आलेलं स्थान हा मुद्दा पुरेसा स्पष्ट करीलच. श्री. रत्नाकर मतकरी यांचं खास अभिनंदन अशासाठी करायला हवं, की बदलत्या संदर्भातील कलाकारांच्या भूमिकेविषयी विद्वत्तापूर्ण आणि संदिग्ध-फसवी भाषणं करून पोकळ परिसंवाद गाजविण्याऐवजी, याविषयीची आपली भूमिका आपल्या माध्यमातून अत्यंत स्पष्टपणे आणि भरीवपणे त्यांनी व्यक्तविली आहे आणि उपर्युक्त चर्चेला अधिक ठोस आणि धारदार संदर्भ आणण्यास मदत केली आहे. ' सामाजिक प्रबोधनासाठी एक साधन – एक उपयुक्त प्रचारसाधन – म्हणून आपली कलाकृती वापरली जावी ', अशी स्पष्ट इच्छा जेव्हा एखादा कलाकार प्रकट करतो, तेव्हा त्यानं आपली खेळी किती पूर्णत्वानं खेळली आहे, याची तर साक्ष पटतेच; पण कलाकारांच्या सामाजिक जबाबदारीची व कलाकृतीच्या सामाजिक आशयघनतेची परिमाणे इंचा-फुटात काटेकोरपणे मोजणाऱ्यांना एक सकस आव्हानही मिळत असते. प्रायोगिक रंगभूमीची चळवळ जिथे चांगलीच रुजली–फोफावली आहे, त्या बंगालमध्ये नाट्यकलावंतांनी अशी आव्हानं यापूर्वीच दिलेली आहेत. उत्पल दत्तसारख्यांची सर्वस्वी तत्त्वनिष्ठ–प्रचारप्रधान रंगभूमी हे एक ठळक उदाहरण. मराठी रंगमंचावरच अशा आव्हानांची वाण होती, ती रत्नाकर मतकरी यांनी समर्थपणे भरून काढण्याचा प्रयत्न केला आहे. यातूनच निघणारा दुसरा मुद्दा– जे लोककथा '७८ च्या यशाचे एक गमक आहे – असा, की मौलिकता आणि बहुमान्यता या दोन्ही वैशिष्ट्यांनी युक्त असल्यामुळे लोककथा '७८ ही घाशीराम कोतवालप्रमाणेच आधुनिक मराठी रंगभूमीवरची एक घटना (event / happening) ठरेल / ठरावी असं मला वाटतं. घाशीराम प्रथम रंगभूमीवर आल्याला, मला वाटतं, सातएक वर्षं व्हायला आली. त्या नाटकाची मौलिकता आणि लोकमान्यता दोन्ही, प्रदीर्घ काळपर्यंत वादग्रस्त अवस्थेत राहिल्या. तथापि घाशीराम हा एक महत्त्वाचा टप्पा असल्याचं आता निर्विवादपणे मान्य झालं आहे. घाशीरामच्या बरोबरीला बसू शकतील अशा या दशकातल्या घटना कोणत्या, असं विचारलं तर ज्या चारएक नाटकांची नावं घेता येतील, त्यात लोककथा '७८ चा मी आवर्जून समावेश करीन. याचीच कारणमीमांसा करण्याच्या उद्देशाने पुढील लेख लिहिणार आहे. एरवी या नाटकाचे रूढार्थाने समीक्षण वगैरे म्हणता येईल असे काही करण्याचा माझा इरादा नाही. या चाकोरीबाहेरच्या नाट्यानुभवाबद्दल आस्था असलेल्या मंडळींनाही ( ज्यात त्याचे सादरकर्तेही अर्थातच आले ) त्याचे ठोकळेबाज परीक्षण न करण्याची कल्पना नापसंत होईलसे वाटत नाही.

(अ) ' लोककथे 'ला मौलिकता आणून देणाऱ्या घटकांमध्ये त्यातील आकारबंध (फॉर्म) व आशय यांची नैसर्गिक एकरूपता हे वैशिष्ट्य महत्त्वाचे वाटते. आकारबंध व आशय यांचे तरल परस्परसंबंध निरखून पाहण्याच्या आम्हा अनेकांच्या उद्योगाला ' लोककथे 'ने चांगलेच खाद्य पुरविले आहे. लोककथेत व्यक्त झालेल्या अनुभवाला स्वतःचा असा वैशिष्ट्यपूर्ण आकार तर आहेच; पण तरीही तो अनुभव त्या आकारातच कुठे गुंतून पडला आहे, अडकला आहे असं होत नाही किंवा त्या आकाराच्या तयार कपड्यात अनुभव छाटून-कातरून ठोकला आहे, असंही दिसत नाही. प्रत्येक अनुभव हा स्वतःचा असा एक जन्मजात आकारबंध घेऊनच येतो, यायला हवा. तो आकारबंध पारंपरिक असला म्हणून नाटक क्रांतिकारक / प्रायोगिक व्हायचं थांबणार नाही आणि पारंपरिक नसलेल्या आकारबंधात हाती येईल तो अनुभव जमेल तसा बसवला, म्हणून त्या नाटकाला यशस्वी प्रयोगही म्हणता येणार नाही. उद्ध्वस्त धर्मशाळा आणि तीन पैशांचा तमाशा ही दोन उदाहरणे या दृष्टिकोनातून (क्रमशः) विचारात घ्यावीत. ' माझ्याजवळ सांगण्यासारखं खूप आहे, ते कोणत्या फॉर्ममधनं सांगणं सोयीचं होईल एवढाच प्रश्न आहे, ' असं म्हणणारा एखादा लेखक आणि ' हा एक फॉर्म बरेच दिवस माझ्या मनात घोळत होता. या नाटकाच्या निमित्तानं तो स्टेजवर रुजवायची संधी मिळाली, ' असं अभिमानानं सांगणारा एखादा नाट्यदिग्दर्शक हे दोघेही सारखेच ॲब्सर्ड वाटतात. नाटकांविषयी हे आग्रहानं व वारंवार लिहावं लागतं. कारण नाट्यानुभव हा (लेखक व दिग्दर्शक अशा) दोन वाहकांद्वारे, म्हणजे एकाऐवजी दोन टप्प्यांतून संक्रांत होत असतो. त्यातून ' नाटक हे दिग्दर्शकाचं माध्यम आहे, ' यासारख्या कल्पना सरसकट सर्वच दिग्दर्शकांच्या डोक्यात गेलेल्या असल्या म्हणजे मराठी प्रायोगिक रंगभूमीवर सध्या जे चालू आहे ते घडते. सारांश, आकारबंधाच्या स्वतंत्र संकल्पनेच्या नादात आशय / अनुभवाला दगा-फटका होण्याची शक्यता चित्रपटाखालोखाल नाटकातच असते. नाट्यनिर्मिती ही प्रदीर्घ प्रक्रिया असल्यामुळे त्या कालावधीत माध्यमाच्या गरजेनुसार अथवा अपरिहार्यतेनुसार नाट-

काच्या मूळ (जन्मजात) आकृतिबंधात काही बदल होतीलही; परंतु ते नवनिर्मितीच्या स्वरूपाचे नसून परिष्करणाच्या, सफाईदारपणा आणण्याच्या, सुधारणेच्या स्वरूपाचे असणे अपेक्षित आहे. एरवी ' Drama is a director's medium, ' असं गंभीरपणे मानणाऱ्या दिग्दर्शकापुढे (तो सक्षम व ठाम असल्यास) लेखक / संकल्पक होण्यावाचून पर्याय नसतो / नाही.

(ब) लोककथा '७८ चे या विषयीचे यश सध्याच्या तथाकथित प्रायोगिकतेच्या पार्श्वभूमीवर अधिकच स्पृहणीय ठरते. इथे लेखक व दिग्दर्शक एकच असण्याचाही काही फायदा झाला असणे शक्य आहे. जे व्यक्तवायचं आहे ते आणि त्याच्या अभिव्यक्तीची पद्धत यामध्ये इतका सुंदर सुसंवाद घाशीराम वगळता आजपर्यंत क्वचितच पहायला मिळाला असेल. दलितांवरचे अत्याचार हा रांगडा, रानटी, प्रिमिटिव्ह अनुभव तितक्याच हादरवून टाकणाऱ्या दांडग्या, बोचऱ्या आणि खडखडीत शैलीनं इथं व्यक्त होतो, तेव्हा आपल्यालाही आशय आणि अभिव्यक्तिबंध यांच्या सयुक्तिकतेबद्दल वेगवेगळी चर्चा करण्याचं कारण उरत नाही. यापेक्षा अन्य, परक्या शैलीत तो अनुभव व्यक्त करायचा प्रयत्न झाला असता, तर त्याची समग्र dentity च बदलून गेली असती, हे आपण जाणू शकतो आणि म्हणून ' अन्यायग्रस्त खेडूत आपली कर्मकहाणी प्रेक्षकांना सांगायची धडपड करताहेत ', अशी पार्श्वभूमी एकदा तयार केल्यानंतर दिग्दर्शक मतकरी जेव्हा स्टेजवरच्या विंग आणि त्यातून जाण्यायेण्याची पद्धत रद्द करून टाकतात किंवा प्रेक्षागृहाचाही वापर रंगमंचाच प्रभाग (extention) म्हणून करू पाहतात तेव्हा रूढ गिमिक्स रहात नाहीत. स्टेजवरच वेषभूषा, विशेष प्रकाशयोजनेसाठी कंदील–मशाली इत्यादी पात्रांच्या हातातल्याच सामानाचा उपयोग, पात्रांच्या हातातल्या वस्तूच वाजवून केलेली पार्श्वसंगीत योजना आणि रंगमंच आणि प्रेक्षागार यांची फारकत (संपूर्णतः शक्य व व्यवहार्यतः आवश्यक नसली तरी) काहीशी कमी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न यांची सांगड जेव्हा सर्वांना गुंतवणाऱ्या, हलवून टाकणाऱ्या आणि आजपर्यंत अव्यक्त अशा आशयाशी बसते, तेव्हा काही तरी नवे घडते. आपली नाटकीयता कायम राखून आपल्याला हवे तेव्हा प्रेक्षकांना नाटकात सामील होण्याची जुलूम-जबरदस्ती मतकरी करताहेत किंवा स्मार्ट आणि धक्कादायक असं काही तरी बेसावध प्रेक्षकांच्या तोंडावर अचानक फेकून बनवाबनवी करण्याचा चाणाक्षपणा ते दाखवताहेत अशी, फसवले गेल्याची भावना कधीही निर्माण होत नाही. दुर्दैवाने पात्रांनी प्रेक्षकवर्गातून प्रवेश करण्याचा प्रकार क्लृप्ती म्हणून अगोदरच इतका बदनाम झाला आहे, की प्रेक्षक प्रारंभी तरी मतकरीचे ताकही फुंकूनच पिणार, त्याला कुणाचाच इलाज नाही.

(क) लोककथा '७८ च्या अनुभवसंपन्नतेबद्दल लिहिणे आवश्यक आहे. या नाटकाची जाहिरात ' एक जिवंत, जळजळीत नाट्यानुभव ' अशी केली जाते व ती रास्तच आहे. (हे विशेष !) वस्तुतः या नाटकाला कथाकल्पना (theme) अथवा कथानक (plot) असे काही मूलतः नाही व नसणे स्वाभाविकच आहे. ' दलितांवरचे अत्याचार ' किंवा ' सामाजिक विषमतापूर्ण सद्यःस्थिती ' असा काही तरी ' विषय ' प्रथमतः मनात धरलेला दिसतो व या केंद्रबिंदूभोवती वृत्तपत्रीय वार्तांच्या स्वरूपात मिळालेले अनुभव होऊन थीम बनली, असा निष्कर्ष मिळालेल्या माहितीवरून व प्रत्यक्ष नाटकाच्या माझ्या (impression) वरून निघतो. (अर्थात, कलाकाराच्या निर्मितिप्रक्रियेविषयीची अधिक विश्वासार्ह माहिती इतपत ढोबळपणानेच

## एक ' अनुभव ' असा मांडला तर

जो अनुभव नुसता बातमी वाचून येत नाही,
तो नाटकाच्या माध्यमातून येऊ शकेल का ?
येईल. नाटक ' अनुभवा 'च्या अंगानं मांडायचं ठरवलं तर.
त्यासाठी काय हवं ? किंवा काय नको ?
संवाद लांब नकोत. आवश्यक तेवढेच हवेत.
प्रत्यक्षपणा अधिक हवा.
एकूण लांबी कमी हवी. मध्यंतर–नकोच.
तांत्रिक सोयींचा फायदा–घेता येणार नाही.
रंगमंच–खेडूत रिंगण धरून स्वतः तयार करतील तोच.
नेपथ्य–त्याला यात जागाच कुठाय् ?
प्रॉपर्टी–जेवढी त्या खेडूताना आपल्याबरोबर आणता येईल तेवढीच.
संगीत–त्यांच्या जवळच्या डबे-थाळद्या, दगड-खिळ्यामधून तयार होईल तेच.
या अनुभवासाठी रंगमंच पुरायचा कसा ?
लांबवरून धावत येणारी मुलगी,
अपरात्री काठ्या आपटत येणारे गुंड,
तालुक्याच्या रस्त्यावर पत्रकं वाटणं–हे अंतर कुठून आणायचं ?
त्यासाठी प्रेक्षागृह वापरणं आलं.
नटमंडळी प्रेक्षकांतून येणं हे कधी काळी ' चूष ' म्हणून केलं जाई.
इथं ते केवळ अंतराची गरज म्हणून.
कधी कधी जुन्याच गोष्टी नव्या कारणांसाठीही वापरता येतात.
प्रेक्षकांना थोडा त्रास होईल. माणसं जवळून जातील.
त्यांच्या वाजवण्यानं कानठळ्या बसतील.
एकाच वेळी चार ठिकाणी लक्ष द्यावं लागेल.
पण हे त्यांनी करावं, ही अपेक्षा.
सगळीच नाटकं सुरक्षित अंतरावरून पाहाणं, ठीक नाही.
या अशा नाटकाच्या अनुभवात त्यांनी स्वतःलाही झोकून द्यावं,
ही विनंती.

मिळणार, हे गृहीतच आहे.) आता यामुळे संपूर्ण नाटक म्हणजे लहान-मोठ्या अनुभवांची एक मालिकाच बनते, जिची गुंफण प्रभावी आणि appealing असल्यामुळे, त्या अनुभवांच्या एकरसतेतून सुत्र करून सोडणारा एक एकाकार अनुभव शेवटी शिल्लक उरतो. उदाहरणार्थ, एक अखंड स्प्रिंग वर्तुळाकार मांडून तिचे कडे बनवले, तर ते करताना—पाहतानाचा अनुभव असाच असेल. इतका एकसंध आणि जबरदस्त अनुभव मराठी रंगभूमी अपवादानेच देते हे अशासाठी नमूद करतो की, नाटकाकडे पाहताना टीकाकार/अभ्यासक त्याच्या अनुभवाची समग्रता (totality of experience) लक्षात घेत नाहीत व त्याच्या विविध अंगोपांगांची चीरफाड वेगवेगळी करीत बसतात अशी जी तक्रार केली जाते, तिला हे उत्तर आहे. अलीकडेच फर्गसन महाविद्यालयाने आयोजिलेल्या 'आधुनिकतेच्या संकल्पने' विषयीच्या एका चर्चासत्रात, प्रा. माधव वझे यांनी वाचलेल्या आपल्या तळमळीच्या व अभ्यासपूर्ण निबंधात वरील तक्रार केली होती, तिला लोककथा '७८ ने एका प्रकारे दृष्टीच दिली आहे. मला ही तक्रार मान्य नाही. याचे एक कारण हेच आहे की, लोककथा '७८ सारखे सन्मान्य अपवाद वगळता मराठी नाटकातील अनुभवविश्वे बहुधा अत्यंत तोकडी, तुटपुंजी, पुनः पुनरावृत्त उद्देशहीन आणि विस्कळित असतात आणि त्यांच्या समग्रतेविषयी त्यांचे सादरकर्तेच पुरेसे जागरूक व सावध नसल्याने अभ्यासक/प्रेक्षक असहाय असतात. माझा हा अनुभव व्यावसायिक रंगभूमीच्याच नव्हे, तर प्रायोगिक चळवळीच्या संदर्भातही खरा आहे. उदाहरणार्थ, नाटकात सूत्रधार वापरण्या—खेळवण्याची फॅशन प्रायोगिक रंगभूमीवर नव्याने रूढ झाली आहे. लोककथा '७८ मध्येही सूत्रधार आहे; परंतु तो नाटकातल्या अन्य पात्रांपैकीच कुणी एक आहे, त्याचे वेगळे अस्तित्व राखण्याचा प्रयत्न केलेला नाही. सूत्रधार म्हणून त्याला काही खास treatment द्यावी, व त्यातून काही साधावे (उदा. एलिअनेशन!) हा विचार त्यामागे दिसत नाही. त्यामुळे इथला सूत्रधार आपला त्रोटक निवेदनाद्वारे तुकडे जोडतो; पाडत नाही. साहजिक नाट्यानुभवाच्या एकात्मतेला त्याची मोलाची मदतच होते, उपद्रव नव्हे. एरवी एकीकडे सूत्रधारासह नाना प्रकारे एलिअनेशन साधण्याची खटपट चालते व दुसरीकडे Totality of Experience च्या गप्पा मारल्या जातात. 'लोककथे'ची अनुभवात्मक एकात्मता तपासायची तर एखाद्या खेड्यात एका तरुणीवर—सवर्ण नसलेल्या तरुणीवर—बलात्कार झाल्यानंतर घडू शकणाऱ्या प्रतिक्रियात्मक घटनांची वेटोळी—कोंडाळी मतकरींनी किती रेखीवपणे आणि बंदिस्तपणे बसविली आहेत, हे पाहण्यासारखे आहे. त्या अल्पवयीन तरुणीचा बलात्कारात ओढवणारा मृत्यू, त्याच्या प्रतिकारार्थ उभा ठाकणारा जगन्या कोळी, गावपाटलाच्या भाडोत्री गुंडांकडून होणारा जगन्याचा खून, त्याच्या बायकोने — सावित्रीने — नवऱ्याच्या बळीविरुद्ध आवाज उठविणे, आंदोलन—प्रसिद्धी—दडपशाही अशा विविध घटना तर्कशुद्ध सुसंगतीने एकातून एक उलगडत जातात. पुन्हा यातली प्रत्येक घटना जशी आधीच्या सूत्राशी सुसंबद्ध, तशीच तिची अंतरचनाही सुबक, बांधीव आहे. उदाहरणादाखल गावच्या व पत्रकारांच्या भेटीचा प्रसंग, अन्याय निवारण समितीची स्थापना, जगन्या कोळ्याचा खून अशा मोजक्या घटना आठवाव्यात. या व अशा बहुसंख्य घटनांचे मतकरीकृत निर्मिती-संकल्पन अत्यंत धारदार व परिणामकारक आहेच; पण त्यात त्यांचा लेखक व दिग्दर्शक म्हणून वाटा तुलनात्मकदृष्ट्या सारख्याच तोलामोलाचा आहे, यातच खूप

## आमचा एक लहानसा प्रयत्न....

आज सगळीकडे तक्रार ऐकू येते—
समाजात नाना दुःखं आहेत;
गरिबांवर अत्याचार होताहेत;
माणुसकी पायदळी तुडवली जातेय्;
साहित्यिक—कलावंतांना मात्र याचं सोयर सुतक नाही...
ते आपल्याच हस्तिदंती मनोऱ्यात राहाताहेत...
त्यांनी आपल्या परीनं समाजकार्याला हातभार लावावा
अशी रास्त अपेक्षा केली जाते.
सामाजिक घटनांचं, गरीबांवर होणाऱ्या अत्याचारांचं,
त्यांच्या दुःखाचं दर्शन घडवण्याचा एक लहानसा प्रयत्न
आम्ही इथं केलाय्.
कुणाचीही बाजू न घेता,
एका प्रामाणिक तटस्थतेनं.
प्रेक्षकांनी आणि टीकाकारांनी त्याला दाद दिलीय्.
या नाट्य-कृतीचा समाज—प्रबोधनासाठी काही उपयोग
होऊ शकेल का ?
सामाजिक कार्यकर्त्यांनी दिलेल्या हाकेला 'ओ' देऊन
आम्ही हा नाट्यप्रयोग निर्माण केलेला आहे.
त्याचा जास्तीत जास्त उपयोग त्यांनी करून घ्यावा ही विनंती.
कृपया खालील पत्त्यावर त्यांनी संपर्क साधावा.
आम्ही सहकार्य द्यायला तयार आहोत.
प्रसंगी अडचण सोसूनही.

रत्नाकर मतकरी, राधा निवास, टिळक रोड,
दादर, मुंबई ४०० ०१४
फोन : ४४३१४२.

काही आले.

(ड) हा नाट्यानुभव जबरदस्त, संपन्न; मौलिक, धारदार, प्रभावी वगैरे आहे, अशा शब्दात त्याचं वर्णन मी वर केलं आहे. ही वैशिष्ट्यं त्याच्यात कुठून आली, या प्रश्नावर फार जागा खर्च करण्याची आवश्यकता आहे असं मला वाटत नाही. या अनुभवाच्या प्रखर सामाजिक आशयानेच ही वैशिष्ट्ये त्याला प्राप्त करून दिली आहेत. सामाजिक बांधिलकी हा कलाकृतीची मौलिकता निश्चित करण्याचा एकमेव निकष नसला तरी एक महत्त्वाचा निकष निश्चितच आहे आणि अशा प्रकारची बांधिलकी मानणारी काहीशी प्रचारकी थाटाची असलेली कलाकृती तिच्या कलात्मकतेला कोणत्याही प्रकारे बाधा येऊ न देताही सामाजिक / तात्त्विक प्रबोधनाच्या प्रवाहात सामील होऊ शकते, याचा ठळक पुरावाच लोककथा '७८ ने आपल्यापुढे ठेवला आहे. आपल्या रंगभूमीच्या (प्रायोगिक + व्यावसायिक ! ) सामाजिक जाणिवा अद्यापही अत्यंत अप्रगल्भ असताना, एक नाटककार एका ताज्या व उग्रगंभीर सामाजिक समस्येची दखल घेऊन तिची हाताळणी आपल्या पद्धतीनं करतो ही कल्पनाच सुखद आहे. मात्र हे करीत असताना किमान तटस्थता / अलिप्तता पाळल्याचा जो दावा नाटककर्त्यांनी केला आहे, तो मला सर्वस्वी चुकीचाच नव्हे तर अनावश्यकही वाटत आहे. या नाटकामध्ये सादरकर्ते व प्रेक्षक या दोघांकडूनही सर्वाधिक गुंतवणूक (utmost involvement) अपेक्षित होती / आहे असेच मला वाटते. एवढेच नव्हे तर जवळजवळ प्रत्येक प्रवेश, मतकरींची सहानुभूती दलित शोषितांच्या पारड्यातच पडत असल्याचे स्पष्टपणे दाखवीत असताना अलिप्ततेचा बडेजाव माजविणे निरर्थक आहे. बरे, नाटकाचा कल अशा प्रकारे किंचित डावीकडे झुकत असला तर त्यातही लाज वाटण्यासारखे काय आहे? वांझ तटस्थतेपेक्षा कुणीही सकस बांधिलकीच अधिक पसंत करणार नाही काय ? नाट्यकथानकातील घटनांचे 'बातमीपण' (newsness) कायम ठेवण्याविषयीचा सादरकर्त्यांचा दावाही असाच अनावश्यक आहे. नाटकात काही बातम्या वाचून दाखविण्यात आल्या असल्या, तरी तेवढ्यावरून नाटकाला संपूर्ण / अंशतः बातमीपणाची कळा येणे हे अशक्यच आहे. त्याने काही नुकसान होते असेही नाही. एक बाब मात्र काहीशी खटकते ती अशी की, इथेही लेखक आपल्याला अनुभव देऊन थांबतो. त्याचे पृथक्करण—विश्लेषण तो सहसा करीत नाही. त्या अनुभवाच्या मागे जाण्याचा प्रयत्न फारसा होत नाही. होईल तेथे प्रश्न oversimplify होण्याचा धोका ओढवतो. परिणामी दलित अत्याचार—समस्या असो की ग्रामीण राजकारण असो, त्याच्या चित्रणातील सूक्ष्मता, भेदकता कमी होते आणि ढोबळपणा वाढतो. 'घाशीराम'मध्ये हा दोष होताच. अलीकडच्या 'सूर्यास्त'मध्ये तर मोठ्या प्रमाणावर होता. 'उद्ध्वस्त धर्मशाळे'त तो अंशतः टाळता आला आणि 'सामना' चित्रपटात बऱ्याच अंशी टाळता आला. डॉ. विद्याधर पुंडलीक यांच्या 'चार्वाका'चेही नाव या यशस्वी यादीत घेता येईल तथापी त्याच्याविषयी मला अधिकाराने काही बोलता येण्याजोगी स्थिती आता नाही.

(ई) शेवटी रत्नाकर मतकरी यांचे अभिनंदन करीत असताना त्यांच्या नटसंचाचा उल्लेख न करणे अप्रस्तुतच ठरेल. अत्यंत गुणी माणसांचा हा संच आहे, ज्यातले अभिनेते विविध समूहदृश्ये तर सफाईने सादर करतातच; पण त्यांच्यापैकी ज्यांना व्यक्तिगत अभिनयदर्शनाला थोडाफार वाव मिळतो ते कलाकार (उदा. सावित्री, पाटील, सूत्रधार ह्या भूमिका वठविणारे कलावंत) तेथेही यत्किंचित उणे पडत नाहीत. नाट्यानुभवाचे जिवंतपण आणि ज्वलंतपण साक्षात करण्यामध्ये, त्याचा रासवटपणा, खडबडीतपणा आणि भीषणता प्रत्यक्ष करण्यामध्ये या नटसंचाचा वाटा एवढा आहे की, ही मंडळी प्रयोगाआधी व प्रयोगानंतर थिएटरच्या आवारातच तळ देऊन बसतात, तेव्हा प्रेक्षकांची त्यांच्याकडे बघण्याची प्रारंभीची दृष्टी शेवटाशी निश्चितपणे बदललेली असते. मध्यंतर न घेता सतत चढता टेम्पो ठेवणाऱ्या या मंडळींनी 'सर्वात्मका सर्वेश्वरा'सारखे त्या संदर्भात अत्यंत बेसूर लागणारे गाणे आळवून नाटकाचा असा अपघाती शेवट का करावा हे समजत नाही; पण एरवी लोककथा '७८ चं नाणं खणखणीत वाजणारंच आहे ! ☐

---


**तीन राजहंस प्रकाशने**

**आणि ड्रॅगन जागा झाला !**

लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये

**फिडेल चे, आणि क्रांती**

लेखक : अरुण साधू । मूल्य । सात रुपये

**पूर्णिया**

लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

# ढाकणे विरुद्ध काळदाते : पृष्ठ ७ वरून

दोन वर्षे हे गृहस्थ मुंबई जनता पक्षाचे उपाध्यक्ष होते. ह्यांचे कर्तृत्व काय ? जनता पक्षाच्या उभारणीत त्यांचं Contribution काय ? मुंबईतले किती कार्यकर्ते त्यांना ओळखतात? पण 'जनसंघी येता कामा नये' ही भूमिका घेऊन अश्वमेधाला निघालेल्या कोणापुढेच हे प्रश्न पडले नाहीत. मोतीरामजी लहान्यांना राज्यसभेची उमेदवारी देतानाही हाच प्रकार. राज्यसभेच्या महाराष्ट्रातल्या पहिल्या दोन जागा सी. एफ. डी. चे गणपतराव भगत आणि समाजवादी बागाईतकरांना दिल्या गेल्या. त्यानंतर तिसरी आणि विदर्भातीलच जागा जनसंघाकडे जाणे क्रमप्राप्त होते; पण तेव्हाही आडवे जाण्याचा मोह टाळता आला नाही. त्या वेळेस पुढे आणलेल्या भूपेंद्रसिंघ कोंघारेकरांबद्दल 'हे कोण गृहस्थ ? मी यांचं नावही ऐकलेलं नाही' असे म्हणण्याची पाळी खुद्द एस्. एम्. यांच्यावर आली आणि याच मंडळींनी याच जनसंघीयांच्या खांद्यावर चढून अध्यक्षपद मिळविण्याची इच्छा बाळगावी हे नवल नाही काय ?

भांड्यातले सर्व तूप आपल्याच पोळीवर ओढून घेण्याच्या वृत्तीखेरीज अन्य कसलेही प्रदर्शन समाजवादी मंडळींनी गेल्या दोन वर्षांत केलेले नाही. मेहेनत करण्यासाठी 'जनसंघी' आणि त्यातून मिळणारे फायदे उपटण्यासाठी आपण अशी सोयिस्कर वाटणी त्यांनी करून घेतली आहे. बापूसाहेब काळदात्यांच्याच औरंगाबाद जिल्ह्याच्या अध्यक्षपदाची निवडणूक उदाहरणादाखल पुरेशी आहे. समाजवादी टी. एस. पाटील हे गेली दोन वर्षे अध्यक्ष होते. यानंतर आ. रामभाऊ गावंडे यांना अध्यक्षपद मिळावे असा प्रस्ताव मांडला गेला; पण बापूसाहेबांनी तो फेटाळून लावून 'निवडणुकी'चा आग्रह धरला. कारण टी. एस. पाटलांच्या विजयाची खात्री होती. त्या वेळेला पक्षांतर्गत लोकशाहीत निवडणुकीला महत्त्व देणारे बापूसाहेब प्रदेश निवडणुकीच्या वेळी मात्र सगळे विसरले आणि तेही केवळ पंधरा दिवसांत ! नगर जिल्ह्याच्या निवडणुकीतही असाच प्रकार केला गेला. 'तिसऱ्या गटाच्या माणसाला अविरोध निवडून देण्याची हवा निर्माण करून, आयत्या वेळेला निवडणुका घ्यायला लावून, अध्यक्षपद पदरात पाडून घेतले गेले. ह्या विश्वासघाताच्या राजकारणामुळेच समाजवादी महाराष्ट्रात एकटे पडले. जनसंघीयांना वगळून बोलावलेल्या बैठकीत धारियांना हेच प्रश्न विचारले गेले. घटनांचा पाढा वाचून 'विश्वास का ठेवायचा?' हा प्रश्न विचारला असता धारिया त्याचे उत्तर देऊ शकले नाहीत; पण ह्यावरून काही शिकतील तर ते समाजवादी कसले ?

याउलट 'जनसंघी' मात्र सगळ्यांना बरोबर घेऊन चालण्याचाच प्रयत्न करीत राहिले. वेळप्रसंगी पडते घेऊनसुद्धा अकोला जिल्ह्याच्या निवडणूकमंडळात १०९ पैकी १०७ मतदार 'जनसंघा'चे असूनही तेथे पूर्वीच्या संघटना कांग्रेसचे राधेशाम अग्रवाल अध्यक्ष म्हणून अविरोध निवडले गेले. वर्धा–भंडारा जिल्ह्यातही अशीच परिस्थिती आहे. ताकद आहे म्हणून सर्वच आपल्या कब्जात घेण्याचे राजकारण 'जनसंघी' आजवर खेळलेले नाहीत आणि म्हणूनच 'त्यांच्या शब्दावर डोळे मिटून विश्वास ठेवता येतो' असे मत 'दुर्बल घटकां'चे नेते व्यक्त करतात.

केंद्रीय मंत्रिमंडळ बनवताना, महाराष्ट्र विधिमंडळ पक्षाचा नेता निवडताना काळदात्यांवर अन्याय झाल्याची भाषा केली गेली, ह्याच्याइतका ढोंगी दावा दुसरा असू शकत नाही. केंद्रीय मंत्रिमंडळाची रचना करताना 'कोटा'पद्धत वापरली गेली हे उघड गुपित आहे. पंतप्रधानांनी प्रत्येक घटकपक्षाला कोटा दिला. माणसे त्या त्या पक्षाने निवडली. त्या वेळेस काळदात्यांचा समावेश मंत्रिमंडळात झाला नसेल तर ती जबाबदारी केवळ समाजवादी नेतृत्वाची आहे. काळदाते अध्यक्ष व्हावेत ही शरद पवारांची इच्छा आहे असाही दावा केला गेला. प्रदेश जनता पक्षाचे अध्यक्ष ठरवणारे शरद पवार कोण ? ही बाहेरच्या मंडळींची पक्षातली ढवळाढवळ नाही काय ? आणि 'जनसंघीयां'च्या नागपूरहून आदेश घेण्याच्या तथाकथित प्रथेबद्दल ऊठसूठ बोंब ठोकणाऱ्यांना ही ढवळाढवळ कशी चालली ?

## बोगस मतदारनोंदणीचा ओरडा

ह्या निवडणुकीत बोगस सदस्यनोंदणी झाल्याचा ओरडाही खूप झाला. खुद्द मृणाल गोरे त्या बाबतीत आघाडीवर होत्या. वस्तुस्थिती दडवून ठेवून विपर्यस्त चित्र रंगवण्याचा हा आणखी एक प्रयत्न. खरं तर जनता पक्षाच्या निवडणूकपद्धतीत 'बोगस' सदस्य नोंदवण्यास वावच नाही. २५ प्राथमिक सदस्य नोंदवणाऱ्याला 'क्रियाशील सदस्य' मानून, त्यालाच मताधिकार देणाऱ्या कांग्रेसच्या निवडणूकपद्धतीत घोटाळे करायला वाव होता; पण जनता पक्षाच्या निवडणूकपद्धतीत प्राथमिक समित्या निवडण्यासाठी प्राथमिक सदस्याला प्रत्यक्ष हजर राहावे लागते. जो सदस्य प्रत्यक्ष हजर आहे तो बोगस कसा ठरवणार ? आणि त्याचबरोबर बोगस सदस्य नोंदवले तर त्यांना मतदानासाठी हजर कुठून करणार ? पण मृणालताईंना आणि बाकीच्यांना सुद्धा हे कळत नव्हते असे थोडेच आहे ? दत्ता ताम्हाणे सारख्या ज्येष्ठ नेत्याच्या निर्वाळ्याला सुद्धा कचऱ्याची टोपली दाखवणाऱ्यांकडून आणखी कसली अपेक्षा करायची ?

जनता पक्षाच्या ह्या निवडणुकीने समाजवाद्यांच्या पुरोगामित्वाचे पितळही साफ उघडे पाडले आहे. ३४ जणांच्या कार्यकारिणीवर निवडून आलेला एकमेव दलित कार्यकर्ता पूर्वाश्रमीचा जनसंघी आहे. उलट समाजवादी नानासाहेब मान्यांना त्यांच्याच पूर्वीच्या सहकाऱ्यांनी तोंडघशी पाडले आणि या थोर मंडळींनी निवडून दिले दुसऱ्या एका 'थोर' गृहस्थांना—पी. के. पाटलांना ! पी. के. पाटील म्हणजे धुळे जिल्ह्यात 'पुरुषोत्तम सेना' उभी करून आदिवासींमध्ये दहशतवाद पेरून नावारूपाला आलेले गृहस्थ. 'विधानसभेत गाढव निवडून आले तरी चालेल; पण पी. के. येता कामा नये' असे उद्गार काळदात्यांनीच एके काळी यांच्याविषयी काढलेले होते आणि हे महाशय 'समाजवादी' मतांच्या कार्यकारिणीत निवडून आलेत ! 'जनसंघीयांनी संधिसाधू मंडळींची मदत घेतली' म्हणणाऱ्या या समाजवाद्यांना जर राजारामबापूंनी साथ दिली असती तर ते योग्य ठरणार होते ! पण तसे झाले नाही आणि राजारामबापू 'वाईट' ठरले; पण ह्याच बापूंना वळवण्यासाठी अखेरच्या घटकेपर्यंत प्रयत्न केले गेले त्याचे काय ? असे प्रश्न उपस्थित करायचेच म्हटले तर शेकड्यांनी करता येतील.

ह्या निवडणुकीने स्पष्ट केलेल्या गोष्टी दोनच. एक म्हणजे 'जनसंघी' विश्वासाचे राजकारण खेळले. त्यात ते यशस्वी झाले तर 'जनसंघीयां'च्या Organizational Ego ला प्रत्युत्तर म्हणून, शह म्हणून आपला Intellectual Ego जोपासण्याचा प्रयत्न समाजवादी मंडळींनी केला; पण त्या वादात ते सगळ्यांशीच Superiority Complex बाळगून तुसडेपणाने वागले आणि एकटे पडले. 'जनसंघी' मात्र संघटनात्मक चातुर्याबरोबरच बौद्धिक डावपेचातही सरस ठरले. समाजवादी मंडळींची वैचारिक कुवत निःसंशय चांगली आहे; पण दुर्दैवाने आज ती वाया जात आहे. पक्षांधणीकडे ती विधायकपणे वळली तर खरोखर एक वेगळेच चित्र निर्माण होऊ शकेल ! □

चित्रपट परीक्षण । सदानंद बोरसे

# अष्टविनायकांची कहाणी

ऐका अष्टविनायका, तुमची कहाणी.

आटपाट नगर होते. तेथे एकदा सगळ्या अष्टविनायकांची मीटिंग भरली. मोरगाव, रांजणगाव, थेऊर, ओझर इत्यादि आपल्या पूर्वापार ठिय्यावरून मिळेल त्या अन् जमेल त्या उंदरावर बसून आठीजण आले. मीटिंगला तोंड फुटले.

' आपल्याबरोबरच्या निरनिराळ्या देवदेवतांना रुपेरी पडद्यावर चमकण्याची संधी मिळाली. संतोषी माता, महालक्ष्मी माँ, भगवान शंकर, विष्णू, बहुतेक सगळेजण आपापले कलागुण सादर करून गेले. खरं म्हणजे कुठंही आपली पूजा होऊन मग कार्यारंभ होतो; पण या फिल्मी दुनियेत आपण फार मागे पडलो. तेव्हा याच्यावर काही तरी तोड काढायला पाहिजे ! '

सगळ्या चर्चेतून अखेर चित्रपटात काम करण्याचा निष्कर्ष बाहेर पडला. झाले, आता चित्रपट काढायचा म्हटल्यानंतर कोणी तरी एक निर्माता हवा; कारण भक्तांकडून आपल्याला टाकली जाणारी सर्व देणगी पुजारीच घेत असल्याने अष्टविनायकांना कोणा तरी बड्या निर्मात्याचा वा फिल्म फायनान्स कार्पोरेशनचा आधार घेण्यावाचून गत्यंतरच नव्हते. त्यांनी त्यातल्या त्यात सोपा व शक्य मार्ग निवडला आणि आपल्या उंदीरगणांना निर्मात्यांच्या शोधास पाठवले.

हाका रे, पिटा रे, पिटा रे डांगोरा; अष्टविनायकांसाठी एक चित्रपटनिर्माता हवा ! काळे उंदीर, गोरे उंदीर, लहान उंदीर, मोठे उंदीर, उंच उंदीर, बुटके उंदीर सगळे निर्मात्यांच्या शोधात बाहेर पडले. त्यांनी जी. पी. सिप्पींपासून एफ. सी. मेहरांपर्यंत बरेच निर्माते हाताळून ( किंवा पंजाळून ) अखेर शरद पिळगावकरांना अष्टविनायकांसमोर हजर केले.

' देवा, काय आज्ञा आहे ?'

' भक्ता, आम्ही तुझ्यावर प्रसन्न आहोत. आम्हाला असे काही तरी व्रत सांग की, ज्यायोगे आम्हाला आमच्या अन्य साथीदारांप्रमाणे चित्रपटात चमकता येईल ! '

' देवा, ही फिल्मलाइन म्हणजे मृगजळ आहे, अळवावरचे पाणी आहे, औट घटकेचे राज्य आहे. तुम्ही सुखकर्ते, दुःखहर्ते आहात. आज दुःखं एवढी बळावली असताना आपली ही पुराणी ड्यूटी सोडून कशाला नसत्या फंदात पडता ? '

' अरे, नाही, नाही. हा आमच्या इभ्रतीचा प्रश्न आहे. कुठली तरी संतोषी माता शे-दोनशे वर्षांपूर्वी कानामागून आली आणि तिखट झाली. पेशवाईत मागमूस नसलेला सत्यनारायणसुद्धा पिक्चरमध्ये गाजवून गेला. मग आम्ही तर पुराणकाळापासून प्रसिद्ध; पण तरी हा सिनेमाचा योग काही नीट जुळला नाही; तेव्हा तूच आम्हाला मार्ग सांग ! '

' देवा, अहो, काय सांगायचं ? हा वसा फार कठीण आहे. तुम्ही हा घेतला वसा टाकून दिला तर ? '

' अरे, नाही, नाही. आम्ही उतणार नाही, मातणार नाही; घेतला वसा टाकणार नाही! तू सांगशील ते नेम–नियम कडकपणे पाळू ! '

अखेर शरदरावांनी अष्टविनायकांना सिनेमाचा वसा सांगितला. ' एक चलती असलेला हिरो घ्यावा, गोड चेहऱ्याची हिरॉइन घ्यावी. त्यांच्या जोडीला लोकप्रिय अशा सर्व नटनट्या या ना त्या निमित्ताने गोळा कराव्यात. चार बरी गाणी बनवून घ्यावीत. आपल्याकडच्या प्रेक्षकांना भक्तिभाव, वात्सल्य, श्रद्धा असे सद्गदित करणारे रस आणि 'सु-दु ' चा झगडा, त्यात ' सु ' चा विजय अशा गोष्टी फार आवडतात ही सर्व पथ्ये सांभाळून त्याला बऱ्यापैकी फिट् बसेल अशी कथा निवडावी. देवा, यात वास्तवता, तर्कशुद्धपणा, पटण्यासारख्या गोष्टी यांना फाटा देऊन, गोड शेवटाकडे लक्ष ठेवून बाकी सर्व साधावे लागते. हे सगळे उद्योग तुम्हाला जमणार असतील तर हा वसा घ्या ! '

अष्टविनायकांनी एकमेकांच्या चेहऱ्यांकडे पाहिले आणि आपण फक्त विद्याधीश असल्यामुळे हे आपल्या आवाक्याबाहेरचे काम असल्याचे ओळखले. पृथ्वीप्रदक्षिणा म्हटल्यानंतर गायीला किंवा आई-बापांना फेरी मारण्याच्या आयडियांचा काळ संपल्याचे त्यांच्या लक्षात आले त्यांनी शरदरावांना सांगितले, ' आमच्यासाठी तुम्हीच हा वसा करा ना. '

शरदरावांनी त्याला मान्यता दिली. ' देवा, तुम्ही फक्त एक काम करा. तुमच्या कर्तबगारीने एखाद्या सश्रद्ध बापाच्या नास्तिक पोराला वठणीवर आणा. एकदम श्रद्धाळू, आस्तिकाळू बनवून टाका. म्हणजे माझ्या कथेला सत्यकथेचा सॉलिड बेस मिळेल. '

' ती कामगिरी आमच्याकडे लागली, ' असे म्हणत अष्टविनायकांनी सांगली जिल्ह्यातील एका उद्योगपतीकडे शरदरावांना जरूर ती व्यवस्था करून ठेवली आणि ' पुन्हा आपली भेट चित्रपटाच्या शेवटच्या शॉटमध्ये,' असे म्हणून आपापले उंदीर भरधाव सोडले.

सांगितल्या वशाप्रमाणे शरदरावांनी घरचाच हिरो–सचिन पकडला. वंदना पंडित नावाचा नवा चेहरा हुडकला. त्यांच्या सुदैवाने हा चेहरा अभिनय वगैरेही करीत होता. त्यानंतर पार जयश्री गडकर–शाहू मोडक–चंद्रकांत–सूर्यकांतपासून उषा चव्हाण–अशोक सराफ–रवींद्र महाजनीपर्यंत सर्व नवे-जुने मराठी लोक गठ्ठ्याने जमवले. या सगळ्यांना वळण लावण्यासाठी राजदत्त नावाचे एक प्रसिद्ध दिग्दर्शक नेमले आणि सांगली जिल्ह्यातील अष्टविनायकांच्या कर्तबगारीला वेठीस धरले.

नास्तिक विरुद्ध आस्तिक, त्याला बुद्धी विरुद्ध श्रद्धा असा मुखवटा एवढा मसाला आणखी सत्त्याण्णव चित्रपटांना पुरून उरेल; मग एका चित्रपटाची काय कथा ? त्यातून या मसाल्याला तर सत्यकथा, सत्य घटनेवर आधारित इत्यादी झणझणीतपणा लाभलेला. साहजिकच का, कसे, कशावरून इत्यादी सर्व प्रश्नांना हात जोडून, डोळे मिटून एकच उत्तर, ' अष्टविनायकांची कृपा. '

वर उल्लेखिलेल्या कलाकारांबरोबरच राजा गोसावी, शरद तळवलकर, पद्मा चव्हाण, डॉ. वसंतराव देशपांडे यांनी चित्रपटातील देवपार्टी–राक्षसपार्टीच्या आघाड्या इमानदारीत सांभाळल्या.

चित्रपटातील शेवटचे ' अष्टविनायका, तुझा महिमा कसा ' हे आठी गणपतींची गाठभेट घडविणारे भयाण बोअर गाणे सोडल्यास बाकी गीते (विशेषतः डॉ. वसंतराव देशपांडेंचे 'दाटून कंठ येतो')नीटस झाली.

अशा रीतीने अष्टविनायकांचा वसा पूर्ण झाला. त्यांना वाटलेले समाधान शेवटच्या शॉटमध्ये त्यांच्या चेहऱ्यांवरून ओसंडताना स्पष्ट दिसले. ज्यांना असे समाधान मिळवायचे असेल, त्यांनी हा वसा घ्यावा किंवा ' अष्टविनायक मोरया ' या नवाक्षरी मंत्राचा एक कोटी जप लिहावा. ही अष्टविनायकाची साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण. ▢